संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०३५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६



## अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू

## पार्थिव विद्या प्रतिष्ठानमधून पुन्हा रुग्णालयात

## अंत्यदर्शनासाठी लोटला जनसागर

## आज अंत्यसंस्कार; नरेंद्र मोदी, अमित शहा उपस्थित राहणार

अखेरपर्यंत फक्त कामंच...

**सिस्टिम शटडाऊन**

**अनेकांची स्वप्नं पूर्ण केली, पण अजितदादांची दोन स्वप्नं अपूर्णच राहिली; वेळेआधीच एक्झिटने महाराष्ट्र सुन्न**

# पहाटेचा सुर्य मावळला

### हा कोणता योगायोग?

२२ जुलै १९५९ - जन्म

२८ जानेवारी २०२६ - मृत्यू

६६ वर्षे, ६ महिने,

६ दिवस

६ वेळा उपमुख्यमंत्री

## तीन दिवसांचा राज्य दुखवटा जाहीर; पुण्यासह बारामती बंद

एखाद्या कार्यकर्त्याला नगरसेवक व्हायचं असतं, नगरसेवक झालं की नगराध्यक्ष व्हायचं असतं. नगराध्यक्ष झालं की आमदार व्हायचं असतं. आमदार झालं की मंत्री बनायचं असतं अन् मंत्री झाले की मुख्यमंत्री. एकंदरीतच काय तर राजकारणात आलेल्यांना भविष्यात मोठमोठ्या पदांवर जाण्याची इच्छा ही असतेच. गेली चार दशकं राजकारणात वावरणाऱ्या अजित पवारांचीही बरीच स्वप्नं होती. मात्र बारामतीमध्ये येत असताना अजित पवारांच्या विमानाला अपघात झाला अन् त्यात त्यांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेनंतर अजित पवारांची स्वप्नंही अधुरीच राहिली. मतदारसंघातला असो किंवा मतदारसंघाच्या बाहेरचा, ज्याचा मुद्दा पटला त्याचं काम करून देणारा नेता म्हणजे अजितदादा. अनेकांच्या स्वप्नांना प्रत्यक्षात उतरवणारे अजितदादा... मात्र अजित पवारांची स्वतःची काही स्वप्नं अपूर्णच राहिली. त्यापैकी पहिलं स्वप्न म्हणजे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाचं.

जे पोटात तेच ओठावर.... हा अजित पवारांचा स्वभाव. त्यामुळे अजित दादाच्या मनातली स्वप्नं महाराष्ट्रापासून कधी लपून राहिली नाहीत. महाराष्ट्राचं मुख्यमंत्री बनणं हे त्या यादीतलं सर्वात पहिलं स्वप्न. मात्र मुख्यमंत्रिपदानं वारंवार हुलकावणी दिल्यानं अजितदादा विरोधकांच्या खिल्लीचा विषयही बनले. पण अजितदादांनी त्याला ना थारा दिला, ना त्याचं मनाला लावून घेतलं. सन 2004 साली जेव्हा मुख्यमंत्रिपदाची संधी आली, तेव्हा मात्र, शरद पवारांनी मुख्यमंत्रिपदाचा मान काँग्रेसला दिला. पण, दुसरीकडे दादांनी उपमुख्यमंत्रिपदाचा विक्रम मात्र मोडून काढला. राज्याचे मुख्यमंत्री बदलत राहिले, पण उपमुख्यमंत्री अजित पवार कायम राहिले. हल्ली तर राज्यात दादांचा दौरा लागला की, भावी मुख्यमंत्री म्हणून दादांचा बॅनर फिक्स होता. पण, नियतीला हे मान्य नव्हतं. जसं दादांचं मुख्यमंत्रीपदाचं स्वप्न अधुर राहिलं, तसं राष्ट्रावादीचे वेगळे झालेले दोन संसार एक करण्याचंही स्वप्नही अजितदादा मागे सोडून गेलेत. राष्ट्रवादी दोन झाल्या होत्या, पण पवारांच्या कुटुंबात ओलावा कायम होता. महापालिकांच्या निवडणुकांपुरत्या पुणे-पिंपरीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढल्या. दोन्ही राष्ट्रवादीच्या मनोमिलनासाठी सर्वात जास्त आग्रही होते अजित पवार. तसे जाहीर संकेतही त्यांनी वेळोवेळी दिले होते. अजितदादांच्या हयातीत राष्ट्रवादी दुभंगली, मात्र दोन्ही राष्ट्रवादीचं सर्वार्थानं मनोमिलन होण्याआधीच अजितदादांनी या जगाचा निरोप घेतला आणि त्यांचं हे स्वप्नही अधूरच राहिलं.

अजित पवारांच्या विमान अपघातानंतर तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जीसह अनेकांनी प्रश्न उपस्थित केले. हा अपघात म्हणजे एक घातपात असल्याचा संशय व्यक्त केला. त्यामुळे पुढे येऊन स्वतः शरद पवार यांनी भाष्य करत हा विषय थांबवला. प्रसार माध्यमांना प्रतिक्रिया देताना शरद पवार म्हणाले, अजित पवार यांचा हा अपघाती मृत्यू आहे. त्याचा महाराष्ट्राला प्रचंड असा धक्का आहे. एक कर्तृत्ववान, निर्णय घेण्याची शक्ती ज्यांच्यात आहे, अशा व्यक्तीला महाराष्ट्र मुकला आहे. जे काही नुकसान झाले ते भरून निघणारे नाही. पण सगळ्याच गोष्टी आपल्या हातात नसतात. हा अपघात आहे. यामागे काही राजकारण आहे, अशा प्रकारची भूमिका मांडली गेली. मात्र, याच्यात राजकारण नाही. हा निव्वळ अपघात आहे. त्याच्या यातना महाराष्ट्राला, आम्हा सगळ्यांना आहेत. कृपा करून इथे राजकारण आणू नये, असे पवारांनी म्हटले आहे.

अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी त्यांचा दिल्ली दौरा रद्द केला आहे. त्या म्हणाल्या, "कोणीही सुरक्षित नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली योग्य चौकशी आवश्यक आहे. हे अनावश्यक भीती निर्माण करणारे आहे की कट आहे, हे काळच सांगेल. तथापि, सर्वात सोपा मार्ग म्हणजे पायलटला दोष देणे, जसे आपण मागील दोन प्रकरणांमध्ये पाहिले आहे."



आज महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनातील काळा दिवस आहे. अजित पवार यांच्यासारखा कार्यक्षम आणि रोखठोक नेता आपल्यातून निघून गेला आहे. त्यांच्याशिवाय महाराष्ट्राचे राजकारण आणि समाजकारण आता 'बेचव' आणि 'आळणी' होईल. त्यांचे मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न अधुरेच राहिले, अशा अत्यंत भावूक शब्दांत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनावर शोक व्यक्त केला. शोक व्यक्त करतानाच संजय राऊत यांनी या अपघाताची चौकशी करण्याची मागणी देखील केली आहे.



बारामती येथे झालेल्या विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. अजित पवार यांचे अकाली निधन ही एक अपरिमित हानी आहे. महाराष्ट्राच्या विकासात, विशेषतः सहकार क्षेत्रातील त्यांच्या विशेष योगदानासाठी ते सदैव स्मरणात राहतील. मी त्यांचे कुटुंब, समर्थक आणि चाहत्यांप्रती शोकसंवेदना व्यक्त करते. ईश्वर या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या इतर सर्व व्यक्तींच्या कुटुंबांनाही हा आघात सहन करण्याची शक्ती देवो. **- द्रौपदी मुर्मु, राष्ट्रपती**



अजित पवार हे जनतेशी घट्ट नाते असलेले, तळागाळाशी मजबूत नाळ असलेले लोकनेते होते. महाराष्ट्रातील जनतेच्या सेवेत सदैव अग्रभागी राहणारे एक मेहनती व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना व्यापक आदर होता. प्रशासकीय बाबींची त्यांना सखोल जाण होती. गरीब आणि वंचितांच्या सक्षमीकरणासाठीची त्यांची तळमळ विशेष उल्लेखनीय होती. त्यांचे अकाली निधन अत्यंत धक्कादायक व दुःखद आहे. त्यांच्या कुटुंबीयांप्रती आणि असंख्य चाहत्यांप्रती मनःपूर्वक शोकसंवेदना. ॐ शांती. **- पंतप्रधान नरेंद्र मोदी**



आज एका अत्यंत दुःखद अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि आमचे एनडीएचे ज्येष्ठ सहकारी अजित पवार यांना गमावल्याची बातमी ऐकून मन अत्यंत व्यथित झाले आहे. अजित पवार यांनी गेली साडेतीन दशके ज्या प्रकारे महाराष्ट्रातील प्रत्येक वर्गाच्या कल्याणासाठी स्वतःला समर्पित केले, ते शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. जेव्हा जेव्हा त्यांची भेट व्हायची, तेव्हा ते महाराष्ट्राच्या जनतेच्या हिताच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करायचे. त्यांचे निधन ही एनडीए कुटुंबासह माझी देखील वैयक्तिक हानी आहे. मी पवार परिवाराप्रती माझ्या संवेदना व्यक्त करतो. दुःखाच्या या प्रसंगी संपूर्ण एनडीए शोकाकुल पवार परिवारासोबत खंबीरपणे उभा आहे. ईश्वर दिवंगत आत्म्यास आपल्या चरणी स्थान देवो. ॐ शांती शांती शांती" **- अमित शहा**



आज माझा मोठा भाऊ हरपल्यासारखी भावना आहे. अजित पवार हे केवळ नेते नव्हते, तर ते एक अभ्यासू, वेळेचं भान ठेवणारे आणि प्रशासनावर मजबूत पकड असलेले व्यक्तिमत्त्व होते. आम्ही अनेक वर्षे एकत्र काम केलं. अजित पवार पहाटेपासून कामाला लागायचे. सकाळी सहा वाजताही त्यांनी आदेश दिल्याचे मी स्वतः पाहिले आहेत. प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास करूनच ते बोलायचे. रोखठोक स्वभाव असला, तरी मनाने ते अत्यंत निर्मळ होते. मंत्रिमंडळात जेव्हा राज्याच्या आर्थिक स्थितीबाबत चर्चा व्हायची, तेव्हा अजित पवार नेहमीच वास्तव मांडायचे आणि योग्य दिशा सुचवायचे. त्यांचा अनुभव, अभ्यास आणि प्रशासनावरील पकड आम्हा सर्वांसाठी मार्गदर्शक ठरायची. आज त्यांच्या जाण्याने पवार कुटुंबाचंच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राचं मोठं नुकसान झालं आहे. मी त्यांना मनापासून आदरांजली अर्पण करतो. अजित पवार यांच्या जाण्याने महाराष्ट्राने एक निर्भीड, धडाडीचा आणि अनुभवी नेता गमावला असून, त्यांच्या कार्याची आठवण कायम जनतेच्या मनात राहील.

**- एकनाथ शिंदे**



“विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं दु:खद निधन झाल्याची बातमी मिळाली. संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली. अजित पवार महाराष्ट्राचे लोकनेते होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेले, महाराष्ट्रातील प्रश्नांची जाण असलेला नेता होता. त्यांच्याबद्दल जनसमान्यांमध्ये प्रचंड मोठी आस्था होती. अजितदादा अतिशय संवेदनशील नेतृत्व होतं. सर्व परिस्थितीत न डगमगता पुढे जाणारं व्यक्तीमत्त्व होतं. महाराष्ट्रासाठी आजचा दिवस हा अत्यंत कठिण दिवस आहे.” ”कारण अशा प्रकारचं नेतृत्व तयार व्हायला अनेक वर्षे लागतात. आणि ज्यावेळी महाराष्ट्राच्या विकासात अतिशय महत्त्वपूर्ण योगदान ते देत होते, त्यावेळी त्यांचं जाणं धक्कादायक आणि अविश्वसनीय आहे. **- देवेंद्र फडणवीस**

# संपादकीय

## घातक पाणी

इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे २७ जणांचा मृत्यू झाला आहे. जलवाहिन्यांमार्फत दूषित पाण्याचा पुरवठा आणि त्यामुळे महू येथील काविळीची साथ याचा फटका नागरिकांना बसत आहे. इंदूरनंतर महूतील घटना, प्रशासन यंत्रणा किती बेपर्वाईपणाची आहे आणि किती नागरिकांच्या आरोग्याशी खेळते आहे हे सिद्ध होते.

मध्य प्रदेशातील इंदूर शहरातील जलसंकट आणि दूषित पाण्याची चर्चा सध्या देशभर आहे. इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे २७ जणांचा मृत्यू झाला आहे. जलजन्य आजारांमुळे अनेक रुग्ण विशेषतः लहान मुले रुग्णालयात दाखल आहेत. ज्या शहराला स्वच्छतेबद्दल सातत्याने पुरस्कार मिळत आले आहेत, त्या राज्यातील लहान मुले दूषित पाण्यामुळे आजारग्रस्त आहेत, हे विदारक सत्य पाहायला मिळत आहे. महूमध्ये २२ जणांमध्ये काविळीची लक्षणे आढळून आली. वास्तविक कावीळ हा काही असाध्य आजार नाही. पण इंदूरच्या जलवाहिन्यांमध्ये असलेल्या प्रदूषणामुळे भयानक रोगाने पुन्हा डोकेवर काढले आहे. इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे काहीजण मृत्यूमुखी पडल्यावर महूतील घटना इंदूरची प्रशासन यंत्रणा किती बेपर्वाईपणाची आहे आणि किती नागरिकांच्या आरोग्याशी खेळते आहे हे सिद्ध होते.

महु येथे तर एक विहीर दूषित पाण्याने भरलेली आढळली. २४ हून अधिक नागरिक येथे आजारी पडले आणि आता या भागातील प्रशासनाने खबरदारीचे उपाय हाती घेतले आहेत. इंदूरच्या घटनेनंतर महु येथील घटना प्रशासनाला खडबडून जाग आणणारी ठरली आहे. पण यामुळे नागरिकांना पुरेसे स्वच्छ पाणी आणि पिण्यासाठी चांगले पाणी मिळेल का असा प्रश्न उभा राहिला आहे. इंदूर की महू असो की भारतातील कोणतेही लहान तालुकास्तरीय गाव असो, येथील नागरिकांना एका व्यापक सत्याला सामोरे जावे लागत आहे. ते म्हणजे स्वच्छ पाण्यापर्यंत पोहोच आणि सुरक्षा हे एकमेकांना पूरक असले पाहिजेत. पण, नेमके तेच त्यांना मिळत नाही. केवळ नागरिकांना पाणी देण्यामुळे आरोग्यावर झालेले परिणाम सुधारणार नाहीत तर त्यासाठी स्वच्छ पाणी मिळणे तितकेच गरजेचे आहे. भारतात जे जलजन्य आजारांच्या साथी येत आहेत. त्यांना दुर्दैवी परंतु पृथक स्थानिक स्वराज्य संस्थांची ढिलाई म्हणून पाहिले जाते. स्थानिक अधिकाऱ्यांचे हे अपयश तर आहेच पण जुनाट पाइपलाइन आणि क्वचित गंजलेल्या पाइपमधून पाणीपुरवठा होत राहणे हेही या साथींचे कारण आहेच. भागीरथपुरा येथील दुर्घटना हे दर्शवते, की हा एक अपघात नव्हता तर संभाव्य दृश्य परिणाम होता ज्यात सरकारी कारभाराचे मॉडेल ज्यात केवळ दिखाऊ स्वच्छता आणि आकडेवारीने मूलभूत सार्वजनिक आरोग्य आणि लोकांना स्वच्छ पेयजल देण्याचे वचन पाळले गेले नाही. इंदूर शहरातील शोकांतिकेने एक प्रश्न निर्माण केला आहे तो म्हणजे नळातून जर सांडपाणी येत असेल तर शहराच्या स्वच्छतेला काय अर्थ? सरकारने टाकलेल्या जलवाहिन्यांमार्फत दूषित पाण्याचा पुरवठा आणि त्यामुळे महू येथील काविळीची साथ याचा फटका नागरिकांना बसत आहे. तसेच इंदूरमध्ये अतिसाराची साथ आली आणि त्यात काही नागरिकांचा बळी गेला आहे. याचा अर्थ सरळ आहे. नगरपालिका प्रशासनाने यात कुचराई केली आहे. जलवाहिन्या गंजलेल्या आहेत आणि भगीरथपुरा येथील एक जलवाहिनी तर स्वच्छतागृहाच्या खाली दबलेली होती. महूमध्ये पट्टी बाजार आणि चंदन नगर येथे गळक्या पाइपलाइनमुळे काविळीची साथ पसरली, महुमध्ये पाणीपुरवठा आणि स्वच्छतेची जबाबदारी कटक मंडळ (कॅन्टोनमेंट बोर्ड)ची आहे. रहिवाशांना उकळून पाणी पिण्याचा सल्ला देण्यात आला. पण 'बैल गेला आणि झोपा केला' अशी ही स्थिती आहे. कॅगने २०१९ च्या अहवालात ८.९५ लाख रहिवाशांना दूषित पाण्याचा पुरवठा केल्याचा ठपका ठेवला होता. तसेच पाण्याच्या नमुन्यांचे सर्वेक्षण न केल्याचा आरोपही करण्यात आला होता. हे म्हणजे नागरिकांच्या आरोग्याशी अक्षम्य छेडछाड आहे असे नमूद करावे लागेल आणि त्याबाबत कुणालाही खंत नाही किंवा खेदही नाही ही बाब जास्त दुःखदायक आहे. अधिकाऱ्यांनी पाण्यामुळे होणाऱ्या आजाराची ५.४५ लाख प्रकरणे नोंदवली. पण त्यातही गंभीर बाब अशी की कॅगने आपल्या अहवालात पाण्याच्या चाचण्यांचा अभाव नोंदला आहे. त्यामुळे इंदूर किंवा महू किंवा मध्य प्रदेशात कुठेच पाणी दूषित आहे की नाही याची काहीच खातरजमा करता येत नाही.

## संस्कृत सुभाषित

अपि शाकं पचानस्य सुखं वै मघवन् गृहे अर्जितं
स्वेन वीर्येण नाप्यपाश्रिय कंचन्।।
(वनपर्व, अध्याय १९३, २९, महाभारत)
अर्थ : कोणावरही अवलंबून न राहता स्वत:च्या हिंमतीवर मिळविलेली मीठ भाकर स्वत:च्या घरी खाण्यात सुख आहे.

## गुरु वचन



### यशाच्या गमकासाठी

यश प्राप्त करण्यासाठी नियम, सिद्धातांना प्रत्यक्षात व्यवहार आणण्याची आवश्यकता आहे. मात्र, बऱ्याचशा व्यक्ती नियम आणि व्यवहार यांची सांगड घालताना टाळाटाळ करताना दिसतात. शिक्षण खूप सारी जमीन काबीज करते; पण त्या जमिनीवर कधी शेती करत नाही. दुर्देवाने पुष्कळ व्यक्ती धन संपत्ती खर्च करून शिक्षण घेतात. पण एखादी छोटी–मोठी नोकरी मिळताच आपली योग्यता दाबून ठेवून आहे त्या नोकरीतच हात पाय पसरतात. आपण आपली योग्यता खुंटीला टांगून ठेवतो आणि तकलादू कार्य करण्यात आयुष्य घालवतो. ऑफिसमध्ये टांगण्यात आलेल्या घड्याळयाकडे याकरिता बघितले जाते की अजून घरी जायंला किती वेळ बाकी आहे, हे दुर्देवी सत्य आहे. जगातला सर्वात महत्त्वपूर्ण नियम, सिध्दांत तोपर्यंत पूर्ण होऊ शकणार नाही जोपर्यंत आपण त्याचे नाते व्यवहारांशी जोडू शकत नाही.

## उपदेशकथा

### बलाढ्याशी लढा

एकदा एका उन्मत्त हत्तीनं वृक्षाला धडक दिली. चिमणा–चिमणीचं घरटं उद्ध्वस्त होऊन खाली पडलं. त्यातली अंडी फ ुटून गेली. ती दोघं दु:खी झाली. हत्तीला धडा शिकवायचा होता त्यांना पण कसा, हा प्रश्न होता. त्याचं सांत्वन करायला आलेल्या माशी, बेडूक व सुतार पक्ष्यानं मिळून एक युक्ती केली. चिमणा–चिमणीला धीर दिला. आपण दुर्बल असलो तरी काय झालं? बलाढ्याशी लढा देऊ. मग ठरल्याप्रमाणे हत्तीच्या कानापाशी माशी गुणगुणली. खड्ड्याच्या टोकापाशी बेडकानं आवाज काढला. तिथे पाणी असावं म्हणून हत्तीनं तिथे पाऊल ठेवलं आणि तो खड्ड्यात पडला. सुतार पक्ष्यानं या गडबडीत त्याचा डोळा फोडला. अशारीतीने तिघांना एकत्र येऊन एकमेकांच्या सहकार्याने त्या बलाढ्य हत्तीला धडा शिकविला.

कथा उपदेश : थोडी युक्ती, साहस आणि एकी असेल तरी बलाढ्याशीही लढा देता येईल.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | २९:२९:०६+ |
| २९ जानेवारी २०२५ | योग:ऐन्द्र २०:२६:५५ |
| गुरूवार | करण:विष्टि १३:५५:२४ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:बव २४:३२:३५+ |
| माघ शके संवत्– १९४७ | सूर्य:मकर |
| संवत्सर – विश्वावसूनाम | चन्द्र:मिथुन१८:३०:४३ |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– माघ | मुस्लिम मास – शाबान |
| ऋतु– सौर शिशिर | तारीख – ९ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:एकादशी | जया एकादशी |
| १३:५५:२४ | भीष्मद्वादशई |
| नक्षत्र:रोहिणी ०७:३१:२६ | रावजी महाराज पुण्यतिथी |
| नक्षत्र:मृगशिर्षा | – खानापूर (रावेर) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८४४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | | | | | | |
| | | 6 | 2 | | 1 | | 7 | 8 |
| 7 | 1 | 3 | | 8 | | | 5 | 9 |
| | 9 | | | | 2 | | | 6 |
| | | | 5 | 9 | 3 | | | |
| 1 | | | 6 | | | | 9 | |
| 3 | 2 | | | 6 | | 9 | 4 | 5 |
| 4 | 5 | | 3 | | 9 | 6 | | |
| | | | | | | 1 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. ८४३ चे उत्तर



## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८४६ – सर हॅरी स्मिथच्या ब्रिटीश सैन्याने अलीवालची लढाई जिंकली.
- १९३२ – दुसऱ्या महायुद्धात जपानने शांघाय काबीज केले.
- १९८६ – अंतराळ यान(स्पेस शटल) चॅलेंजरचा उड्डाण करताना विस्फोटात विनाश. सात अंतराळयात्र्यांचा मृत्यू.
- २००७ – गालेव मगादला इस्त्राइलचे पहिले मुस्लिम राज्यमंत्री बनले.
- २००८ – बॉलीवुड किंग शाहरुख खानला फ्रान्स सरकारचा प्रतिष्ठित पुरस्कार 'इंसिग्निया ऑफ ऑफिसर इन द आर्डर ऑफ आर्टस अँड लेटर्स'ने गौरविण्यात आले.

### राष्ट्रीय

- २००८ – भारतीय टेनिस स्टार सानिया मिर्झा डब्ल्यूटीएच्या क्रमवारीत २९ व्या स्थानावर पोहोचल्यासोबतच ती अशियाची पहिल्या क्रमांकाची खेळाडू बनली.
- २००८ – के.ई.सी. इंटरनॅशनलचे व्यवस्थापकीय संचालक रमेश चांडक यांची उद्योगजगतातील भरीव कामगिरी करणाऱ्या व सी.ए. प्रोफेशनमध्ये योगदान देणाऱ्या यशस्वी व्यक्तीची चार्टर्ड अकाउंटंट बिझिनेस लीडर या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

### जन्म

- १४५७ – हेन्री सातवा, ब्रिटीश राजा.
- १९८१ – एलायजाह् वूड, अमेरिकन नट.

### निधन

- ८१४ – शार्लमेन, ब्रिटीश क्रांतिकारी.
- १९८६ – स्पेस शटल चॅलेंजरचे प्रवासी
- २००७ – ज्येष्ठ संगीतकार ओ.पी.नय्यर यांचे हृदयविकाराने निधन.

## : SMS :

Kaha Ho Itne Dino Se SMS ki Class Se Absent Ho,Agr Aj MSG School Me Nai Aae To Apka Naam SMS class Se Kat Dia Jayga.
Frm: Ur PRINCIPAL

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २७.९ | १८ |
| अहमदनगर | २७.५ | १८ |
| अकोला | ३०.६ | १९.१ |
| अमरावती | २९.३ | १७.७ |
| बीड | ३१.१ | १९.१ |
| भंडारा | २९.२ | १३.९ |
| बुलढाणा | १८.२ | ९.५ |
| चंद्रपूर | ३०.३ | १८.२ |
| चेन्नई | ३०.५ | २४.१ |
| नवी दिल्ली | १८.५ | ११ |
| धुळे | ३०.२ | २०.३ |
| गोंदिया | २९ | १६.२ |
| जळगाव | ३०.६ | १८.४ |
| कोल्हापूर | २९.२ | १९.१ |
| लातूर | २८.६ | १९.४ |
| मुंबई | २६.५ | २२.६ |
| नागपूर | २८.९ | १६.३ |
| नांदेड | ३० | २०.४ |
| नंदूरबार | २६.५ | १९.६ |
| नाशिक | २८ | १६.८ |
| पुणे | २७.२ | १६.७ |
| पंढरपूर | २९.९ | १९.९ |
| सातारा | २८.८ | १५ |
| सांगली | २९.७ | १९.७ |
| सोलापूर | २९.८ | १९.८ |
| वर्धा | ३०.३ | १६.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : दक्षिण शारीरिक तंदुरुस्ती नीट राखता येईल.

**तुळ :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पश्चिम निरर्थक प्रश्नात वेळ जाणे शक्य. वैवाहिक साथीदाराच्या काही चुका उदार मनाने सोडून द्या.

**वृषभ :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : दक्षिण व्यसनी मित्रांची संगत यातून वेळीच सुखरूप बाहेर पडण्याचा प्रयत्न करा.

**वृश्चिक :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पश्चिम नोकरीच्या ठिकाणी छोट्या छोट्या कारणांनी हताश होऊ नका. राग आणि त्रागा याला स्थान देऊ नका.

**मिथुन :** शुभ रंग : लाल: शुभ दिशा : पूर्व घरातील ज्येष्ठांचा सल्ला अवश्य घ्या. धार्मिक किंवा राजकीय नेत्यांच्या गाठीभेटी मोठे घबाड मिळवून देणाऱ्या ठरतील.

**धनु :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पश्चिम आपले जुने मित्र भेटतील. गतकाळातील आठवणींना उजाळा मिळेल.

**कर्क :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पूर्व पैशाचा वाढता ओघ कामाचे प्रमाणही वाढविणारा ठरेल. खाण्या–पिण्याच्या काही सवयीचा त्रास होणे शक्य.

**मकर :** शुभ रंग : हिरवा : शुभ दिशा : पूर्व रोकड, मौल्यवान वस्तू, महत्त्वाची कागदपत्रे इ. चोरी, हरवणे किंवा नैसर्गिक कारणांनी नुकसानीत जाणार नाही हे पहा.


**सिंह :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : पश्चिम कोणाला त्रास न देण्याच्या वृत्तीबरोबर त्रास करून न घेण्याचाही सराव हितकारकच ठरेल.

**कुंभ :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पूर्व विवाहविषयक बैठका यशस्वी होतील. आजोळच्या काही शुभवार्ता मन उल्हसित करतील.

**कन्या :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पूर्व सरकारी नोकरदारांना घरगुती प्रश्नासाठी जास्तीत जास्त वेळ काढावा लागेल. महत्त्वाच्या बैठका यशस्वी होतील.

**मीन :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा : दक्षिण नोकरीच्या ठिकाणी छोट्या छोट्या कारणांनी हताश होऊ नका. राग आणि त्रागा याला स्थान देऊ नका.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८४४



### आडवे शब्द

१. मारुती
५. लाकडाची (वस्तू)
८. राग
११. जास्तीत जास्त व कमीत कमी
१३. रणांगण
१४. द्राक्षाचा, केळ्यांचा घोस
१५. पातळ खांब
१६. बातमीदार
१७. पुन्हा
१८. संगीतसम्राट
२१. रेती
२३. हिंदीत माळ
२४. प्रख्यात, प्रसिद्ध
२६. कीर्तनकार, ह.भ.प.चे विस्तृत रुप
२८. मांडणी
२९. राजाची पत्नी
३०. विधवेशी लग्न
३२. धुंदी
३३. सापाने टाकलेली त्वचा
३४. पवित्र
३६. कमळ
३७. झोपडी
३८. वर–वधुमधील पडदा
३९. घागरा
४१. धार्मिक गट
४२. आकाश
४४. पिता
४५. फळांचे पेय
४६. रद्द
४७. जन्म–मृत्यू
४९. आणि
५०. नशा आणणारा, कैफी
५२. लोणच्यातील द्रव मसाला
५४. गर्दभ
५५. गवंड्याकडील सिमेंट थापण्याचे साधन
५६. फुलांची माळ
५७. एकापेक्षा दुसरा वरचढ
५९. हुक्की, लहर
६०. चौथा हिस्सा
६१. खटला, हक्क सांगणे
६२. एकावर एक रचलेले
६४. नाव हाकणारा
६५. विमानाची धावपट्टी (इंग्रजी)
६६. जाळण्यायोग्य
६७. धमनी

### उभे शब्द

२. तोटा
३. आईचा भाऊ
४. -- दमयंती
५. तिबेटी धर्मगुरु
६. दयाळू
७. युद्ध
८. साथसोबत
९. तणाव
१०. अवघड, कष्टप्रद
१२. चावी
१३. पत्नी
१४. राहण्याची जागा
१५. पृथ्वीभोवतीचा हवेचा पट्टा
१७. पळून जाणे
१९. सेनापती
२०. वाकण्याची क्रिया
२१. वायू, वारा
२२. रक्त सांडणे
२३. भडीमार
२५. नमस्कार
२६. विश्वासघातकी
२७. गुणाकार
३१. सरसकट
३३. खर्चात कपात
३४. वार्ता, समाचार
३५. बाळभाषते पाणी
३६. प्रधानमंत्री
४०. तीव्र ऊन
४३. जाणकार
४३अ. नम्र, वाकलेला
४४. ढग (सं), भरभर
४५. अखेरीस
४७. लोकसंख्येची मोजणी
४८. यजमान
५०. मावशीचा मुलगा
५१. गोष्टी सांगणे
५२. संसद सदस्य
५३. रसपूर्ण
५८. उग्र वासाची एक पालेभाजी
६३. फळातील द्रव

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ८४३ चे उत्तर


आडवे उत्तर : १.मोगल ३.सोमवती ६.मग ८.सदा ११.ताजमहाल १३.मजलदरमजल १६.लीन १८.यमुना २०.बरका २१.नाक २२.गरम २५.मतदार २६.बाट २७.करवट २८.कलमदान २९.ताई ३०.मना ३१.स्वीय ३४.वरवर ३७.करतल ४१.दामोदर ४४.तमा ४५.जळवात ४६.जर ४७.शूर ४८.वचनावचनी ५०.पाणी ५१.सराफ ५२.नार ५३.काळ ५४.शर ५६.पडदा ५७.खरवस ५८.समक्ष ६०.रविवासर ६३.कर्तन ६४.उदास ६६.सरण ६७.नद ६९.मदार ७०.वजीर ७१.वाणी ७२.रट्टा ७३.शरद ७४.भोकर ७५.पारोसा ७६.आरमार ७७.सापळा ८०.दुवा ८१.लक्ष ८२.मस्त ८३.पापणी

उभे उत्तर : १.मोगली २.लता ३.सोम ४.महा ५.वलय ६.मज ७.गलबत ८.सरकार ९.दाम १०.हलकट १२.जळमट १३.मना १४.दरदाम १५.जनाबाई १७.नगर १९.मुक्काम २३.रवरव २४.हकनाक २५. मनस्वी २७.करवत २९.ताठर ३२.यदा ३३.सटरफटर ३५.रमावर ३६.रचनाकार ३८.रजनीश ३९.तळ ४०.लवाद ४२.मोजणीदार ४३.दर ४७.शूरा ४९.वळवळ ५०.पाड ५१.सकवार ५२.नामकरण ५५.रसदार ५६.पक्ष ५७.खनन ५९.मस ६१.विसरभोळा ६२.सणवार ६४.उदाहरण ६५.अवदसा ६८.दरसाल ७३.शरम ७५.पावा ७८.पसा ७९.राणी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### सचिन बेंडभर यांच्या समीक्षणात्मक ग्रंथाला कोल्हापूरचा पुरस्कार जाहीर




■ मराठी बालकुमार साहित्य सभा कोल्हापूर कडून होणार गौरव

पुणे (दैनिक संध्या) : कोल्हापूर येथील मराठी बालकुमार साहित्य सभेचे 2025 या वर्षाचे साहित्य पुरस्कार नुकतेच जाहीर झाले. यात बालसंकीर्ण विभागात सचिन बेंडभर यांच्या समग्र मराठी साहित्य कृतींचा रसग्रहणात्मक अभ्यास या समीक्षणात्मक ग्रंथाला उत्कृष्ट साहित्य पुरस्कार जाहीर झाला असल्याचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत पाटील आणि उपाध्यक्ष परसराम आंबी यांनी कळविले आहे. समग्र मराठी साहित्यकृतींचा रसग्रहणात्मक अभ्यास हा समीक्षणात्मक ग्रंथ असून यात बेंडभर यांनी एकूण 75 पुस्तकांचे परीक्षण केले आहे. या पुस्तकात प्रा. कुंडलिक कदम, मीनाक्षी पाटोळे, प्रा. अलका सपकाळ, मनोहर मोहरे, शेखर फराटे, विठ्ठल वळसे पाटील, तानाजी धरणे, सुजाता शिंदे, रवींद्र जवादे या नव्या पिढीतील लेखकांबरोबर प्रा. साईनाथ पाचारणे, राजीव तांबे, एकनाथ आव्हाड, आबा महाजन, गणेश भाकरे, संगीता बर्वे, कैलास दौंड, फारुक काझी, सुरेश सावंत, प्रशांत असणारे, डॉ. श्रीकांत पाटील, प्रा. देवबा पाटील, संजय ऐलवाड, सुनिताराजे पवार आणि उत्तम सदाकाळ या नामवंत साहित्यिकांचाही समावेश आहे. सचिन बेंडभर यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल शिक्षण आणि साहित्य क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




### संगीत आणि नृत्याच्या माध्यमातून जागविली देशभक्तीची भावना

पुणे (दैनिक संध्या) : जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट आणि सृजनसभा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय आंतरशालेय प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर संगीत-नृत्य करंडक स्पर्धेत संगीत आणि नृत्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी देशभक्तीची भावना जागविली. विविध शाळा व महाविद्यालयांतून आलेल्या स्पर्धकांनी राष्ट्रप्रेमाचा सुरेल व तालबद्ध आविष्कार सादर केला. स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा देखील नुकताच संस्थेच्या नऱ्हे कॅम्पसमध्ये पार पडला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर उपस्थित होते. स्पर्धेत 'देशभक्ती' या विषयावर आधारित समूहगीत गायन, समूह नृत्य तसेच छोटा ख्याल गायन अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. इयत्ता पाचवी ते बारावी, १८ ते २१ वयोगट तसेच खुल्या गटात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेतील विजेत्यांना धनादेश, मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. राज्यभरातील शाळांमधून आलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलेतून देशभक्तीची भावना प्रभावीपणे मांडली. ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि सांस्कृतिक मूल्यांची जोपासना व्हावी, हा या स्पर्धेमागील उद्देश आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांचा सर्वांगीण विकास घडतो. तसेच आजच्या पिढीमध्ये देशभक्तीची भावना जागृत होण्यासोबत आपल्या कला जोपासण्याची मूल्ये देखील रुजतात.

### दादांची रुबाबदार पकड अन् प्रेमळ स्वभाव खरंच खुप भारी होता : आदित्य ठाकरे

पुणे (दैनिक संध्या) : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोकमग्न झाला आहे. बारामती विमानतळाजवळ झालेल्या भीषण विमान अपघातात त्यांचे निधन झाले. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचारासाठी ते मुंबईहून बारामतीकडे जात असताना हा अपघात घडला. या दुर्घटनेत अजित पवारांसह एकूण सहा जणांचा मृत्यू झाला आहे. अजित पवारांच्या अकाली जाण्याने राजकीय वर्तुळातन तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे. आमदार आदित्य ठाकरे यांनी सोशल मीडियावर भावनिक पोस्ट शेअर करत आपल्या भावना मांडल्या आहेत. आदित्य ठाकरे यांनी सोशल मीडियावर भावनिक पोस्ट शेअर करत म्हंटले कि, अजित दादांची बातमी ही धक्कादायक आहे! शब्दच नाहीत. दादांसोबत गेले ५-६ वर्षं काम करण्याची संधी मिळाली... पहिलं सरकारमध्ये आणि नंतर काही दिवस विरोधी पक्षात, असं आदित्य ठाकरे यांनी म्हंटल आहे. अजित पवारांची विधिमंडळ कारभारावर असलेली रुबाबदार पकड आणि प्रेमळ स्वभाव हा आमच्यासारख्या अनेकांना आवडायचा.

# “एवढे उद्धट होण्यासाठी मला स्वत:लाच पटवून द्यावे लागते”

## ‘जगद्धात्री’ मालिकेत तपस्याची भूमिका साकारणारी अभिनेत्री येशा हर्सोरा सांगते



पुणे (दै. संध्या) :

झी टीव्ही वरील ‘जगद्धात्री’ मालिकेने आपल्या दमदार कथाकथनामुळे प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. मालिकेतील अनेक प्रभावी पात्रांमध्ये येशा हर्सोरा साकारणारी तपस्या सध्या विशेष चर्चेत आहे.तिचे खरे रंग आता मायादेशमुख (सयंतानी घोष) समोर उघड झाल्यामुळे ती सध्या कथानकाची प्रमुख आकर्षण ठरली आहे. तपस्या ही नेहमी दिसणाऱ्या शांत, नम्र मालिकेतील पात्रांसारखी अजिबात नाही. ती स्पष्टवक्ती, चिडचिडी, स्वतःला विशेष समजणारी आणि कोणतीही माफी न मागता उद्धटपणे वागणारी आहे—विशेषतः तिची बहीण जगद्धात्री (सोनाक्षी बत्रा) हिच्याबाबत.

तपस्याच्या भूमिकेत उतरल्याबद्दल बोलताना येशा सांगते की हे पात्र तिच्या वास्तविक स्वभावापेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. खरं तर, तपस्याची भूमिका साकारणे हे तिच्या आतापर्यंतच्या सर्वात आव्हानात्मक कामांपैकी एक ठरले आहे.ती म्हणते, “एवढं उद्धट वागण्यासाठी मला खरंच स्वतःलाच पटवून द्यावे लागते. तपस्या खूपच स्पष्टवक्ती आहे आणि अनेकदा स्वतःला व्यक्त करताना अगदी‘बदतमीज’वाटते. अशी नकारात्मकता माझ्यात नैसर्गिकरित्या नाही त्यामुळे प्रत्येक दृश्यापूर्वी त्या पात्रातील आक्रमकपणा आणि ताठरपणा दाखवण्यासाठी मी स्वतःला मानसिकरीत्या तयार करते. बहुतांश उच्चभ्रू कुटुंबकथांच्या मालिकांमध्ये तपस्या ही अनेकदा एकमेव व्यक्ती असते जी खरे बोलते. तिची बोलण्याची पद्धत खरखरीत आणि उर्मट असली, तरी ती जे सांगते त्याला साधारणपणे पूर्ण अर्थ असतो.त्या धूसर भागामुळे तिचे पात्र खूप वास्तविक वाटते आणि ती साकारताना प्रचंड गुंतवून ठेवते. तपस्या अत्यंत अधीर स्वभावाची आहे आणि म्हणूनच ती वारंवार अडचणीत सापडते. हे पात्र साकारताना मला समजलं की खऱ्या आयुष्यात शांत राहणे आणि संयम बाळगणे किती महत्त्वाचे आहे. मी जाणलं आहे की आक्रोशातून किंवा उतावीळपणे दिलेल्या प्रतिक्रिया क्वचितच उपयोगी पडतात, आणि कधी कधी थोडा विराम घेतला तरी परिस्थिती पूर्णपणे बदलू शकते. मला अशा भूमिका साकारायला खूप आवडतात ज्या मला एक अभिनेत्री म्हणून आव्हान देतात. तपस्या मला भावनिक आणि मानसिकदृष्ट्या पुढे ढकलतेआणि तेच मला सर्वाधिक उत्साहित करते. अशा भूमिका कलाकार म्हणूनच नव्हे तर व्यक्ती म्हणूनही तुम्हांला विकसित व्हायला मदत करतात.”

तपस्याचा राग विशेषतः मायाबद्दल,आता अधिकच वाढला आहे. मायाचा अनादर केल्यामुळे जगद्धात्रीने तिला कानशिलात मारल्यानंतर तपस्या आणखी कडवट आणि चिडकी झाली आहे. तिने मायाचे आयुष्य असह्य बनवण्याचा निश्चय केला असून गुंजन आणि मायाचा पूर्व पती शरद यांना वापरून तिच्यासाठी अडचणी निर्माण करण्यास सुरुवात केली आहे.

दुसऱ्या बाजूला, जगद्धात्री आणि शिवाय (फर्मान हैदर) मुसाला पकडण्यासाठी आणि मुलींना वाचवण्यासाठी एका धोकादायक मोहिमेवर निघतात. ते यात यशस्वी होतात, पण त्यांची संकटे अद्याप संपलेली नाहीत. अनेक अनुत्तरित प्रश्न आणि नव्या आव्हानांसमोर, जगद्धात्री आणि शिवाय पुढील अडथळ्यांवर मात करू शकतील का?

शिवाय आणि जगद्धात्रीच्या पुढील प्रवासात काय घडणार आहे आणि त्यांची नवी मोहीम कशी उलगडते, हे जाणून घेण्यासाठीपहा‘जगद्धात्री’ही मालिका दररोज रात्री 10 वाजताफक्त झी टीव्हीवर!

## प्राचीन संहिता गुरुकुलात चरक पारायण आयुर्वेदाच्या ५० विद्यार्थ्यांचा सहभाग

पुणे (दै. संध्या) :

■ वैद्य हरीश पाटणकर यांचा संकल्प

आयुर्वेदातील आध्यात्मिक, धार्मिक व शास्त्रीय परंपरेचे जतन करणारा एक ऐतिहासिक उपक्रम प्राचीन संहिता गुरुकुल, सदाशिव पेठ पुणे येथे आयोजिला होता. आयुर्वेदाचार्य वैद्य हरीश पाटणकर यांच्या संकल्पनेतून आयोजित उपक्रमात आयुर्वेदाच्या ५० विद्यार्थ्यांनी सहभागी होत सलग आठ दिवस चरक संहितेचे पारायण केले. नव्या वर्षाच्या निमित्ताने पवित्र, मंगल व साधनायुक्त वातावरणात आयुर्वेदशास्त्र व त्याचा अभ्यास करीत विद्यार्थ्यांनी चरक पारायण यज्ञ केला. आयुर्वेदिक व आध्यात्मिक साधनेच्या दृष्टीने अत्यंत पवित्र मानल्या जाणाऱ्या या पारायणाची सांगता विद्यार्थ्यांच्या सत्काराने करण्यात आली. वैद्य अनंत धर्माधिकारी, वैद्य हरीश पाटणकर यांच्या हस्ते, तसेच डॉ. स्नेहल पाटणकर, पंकज पाटणकर, डॉ. विवेक आंबरे व ज्ञानसंकुल विद्यार्थी संघाच्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत प्रमाणपत्र वितरण झाले. वैद्य संतोष सूर्यवंशी, वैद्य बावडेकर, वैद्य प्रयाग सेठिया, वैद्य चिन्मय फडके, वैद्य वैभव मेहता, संस्कृत भारतीचे माधव केळकर गुरुजी, वैद्य सुश्रुत गाडगीळ यांनी विद्यार्थ्यांना शास्त्रार्थ, साधना व आचारधर्म यांचे सखोल मार्गदर्शन केले. 'चरक पारायणासारखे उपक्रम आयुर्वेद विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, शिस्त व साधनेची वृत्ती निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरतात, असे वैद्य हरीश पाटणकर यांनी नमूद केले.

## दुखापत होऊनही अभिनयाची जिद्द काही सोडली नाही

पुणे (दै. संध्या) :

■ अभिनेत्री स्नेहा बालपांडेचं कलाकार मंडळींकडूनही होतंय कौतुक

■ पायाला दुखापत तरी केले सलग तीन प्रयोग; the rebel फेम स्नेहा बालपांडेचं कौतुक, कामाची पोचपावती मिळाली अन्...



रंगभूमी आणि अभिनयक्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री स्नेहा बालपांडे सध्या चर्चेत आहे. The Rebels ही तिची ओळख केवळ नावापुरती मर्यादित नसून, ती तिच्या अभिनयशैलीतून सातत्याने प्रकट होताना दिसते. नाटकांच्या सरावापासून प्रयोगांपर्यंतचा तिचा प्रवास संघर्ष, शिस्त आणि सातत्य यांचा संगम नेहमीच मनाला भावणारा आहे. धर्म, समाजव्यवस्था आणि मानवी भावना यांवर भाष्य करणाऱ्या भूमिका ती अत्यंत प्रामाणिकपणे साकारते. वाटेत आलेले दुःख आणि आव्हाने तिने कधीही दुर्बलता न मानता, त्यांना आपल्या अभिनयाची ताकद बनवत पेलली आहेत. the rebels या नाटकाच्या प्रॅक्टिस दरम्यान स्नेहाच्या पायाला दुखापत झाली. असं असतानाही पुण्यात होणाऱ्या मंच उत्सव २०२६ नमस्ते थिएटर द्वारे आयोजित फिल्म फेस्टिव्हलला स्नेहाने the rebels या नाटकाद्वारे मंच गाजवला. कलाकाराला अभिनय जीवापेक्षा प्रिय असतो हे वाक्य स्नेहाने खरं करून दाखवलं. दुखापत होऊनही स्नेहाने सलग तीन प्रयोग कोणतीही काचकूच न करता जबाबदारीने पार पाडले. अर्थात यांत कलाकाराची अभिनयप्रती असलेली निष्ठा दिसून येते. तिच्या या डेरिंगला अभिनेता चिन्मय उदगीरकरनेही दाद दिली.

स्नेहाच्या पायाला झालेल्या दुखापतीची सत्य परिस्थिती पाहून चिन्मय अवाक झाला आणि त्याने तिच्या भूमिकेचे, अभिनयाचे तोंडभरून कौतुक केले. एकूणच या सगळ्या अनुभवाबाबत बोलताना स्नेहा म्हणाली, “प्रॅक्टिसदरम्यान पायाला दुखापत झाली तेव्हा एक दोन दिवस मी आराम करून पुन्हा कामाला सुरुवात करायची हे ठरवलं होतं. आपली जबाबदारी आपण पूर्ण करायची आधीपासून ठरलं होतं. यावेळी नाटकाच्या टीमने मला भरपूर सपोर्ट केला. माझ्या पायाला दुखापत झाली म्हणून भूमिकेत थोडेफार बदल करण्याचे ठरवलं होतं मात्र मी माझ्या मतावर ठाम होते आणि ही भूमिका मी जशी आहे तशीच निभावणार असं ठामपणे सांगितले. मंचावर परफॉर्म करताना पाहून ज्यावेळी चिन्मय सरांनी माझं कौतुक केलं तेव्हा माझ्या कामाची हीच पोचपावती आहे हे मला कळालं”.

## एमआयटी एडीटी विद्यापीठात ७७वा प्रजासत्ताक दिन दिमाखात साजरा

पुणे (दै. संध्या) :



लोणी-काळभोर (पुणे) येथील एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणे येथील मॅनेट इमारतीच्या प्रांगणात ७७वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विशिष्ट सेवा मेडल (VSM) प्राप्त लेफ्टनंट जनरल व माजी महासंचालक, ऑर्डनन्स सेवा (DGOS) आर. के. कुशवाह (निवृत्त) यांच्या हस्ते ध्वजरोहण सोहळ्याने झाली.

यानंतर विद्यार्थ्यांनी नृत्य व देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून उपस्थित सर्वांना मंत्रमुग्ध केले. यावेळी एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र. कुलपती प्रा.डॉ.मंगेश कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट डॉ. सायली गणकर, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. मोहित दुबे, डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. नचिकेत ठाकूर, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, मॅनेटचे प्राचार्य कॅप्टन प्रेरित मिश्रा, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. सुराज भोयार आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना लेफ्टनंट जनरल कुशवाह म्हणाले, भारत हा खऱ्या अर्थाने विविधतेत एकता असणारा देश आहे. ही विविधता भाषा, धर्म, संस्कृती, वयोमान अशा सर्व पैलूंमध्ये नांदताना दिसते. हीच विविधता मला आज एमआयटी एडीटी विद्यापीठात अनुभवायला मिळाली. विद्यार्थ्यांनो, कायम लक्षात ठेवा की आयुष्यात कष्टाला पर्याय नाही. यश व अपयश या नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे अपयशाने खचून न जाता सातत्यपूर्ण प्रयत्न करणाऱ्याला यश नक्कीच मिळते, असेही ते म्हणाले.

याप्रसंगी बोलताना प्रा. डॉ. मंगेश कराड म्हणाले, आजचा दिवस भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यवीरांची आठवण करून देणारा व त्यांना नमन करण्याचा आहे. गतवर्ष भारतीय लोकशाहीसाठी उल्लेखनीय ठरले असून अनेक आघाड्यांवर भारताने लक्षणीय प्रगती केली आहे. त्यामुळे भारतीयांनी स्वातंत्र्यानंतर मिळालेल्या अधिकारांचा सदुपयोग करावा व विकसित भारताच्या वाटचालीत हातभार लावावा, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार महाराष्ट्र नौदल शिक्षण आणि प्रशिक्षण अकादमी (मॅनेट) च्या कॅडेट्सनी केले. यावेळी एमआयटी सीबीएसई स्कूल व विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी देशभक्ती गीतांवर नृत्याविष्कार सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

## रुपाली चाकणकरांनी व्यक्त केला शोक

पुणे (दै. संध्या) :

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार यांचं आज विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. जिल्हा परिषद निवडणुकांच्या प्रचार सभांच्या निमित्ताने मुंबईहून बारामती दौऱ्यावर निघाले असताना लँडिंगवेळी अजितदादांचे विमान कोसळले आणि स्फोट होऊन ही दुर्घटना घडली.

त्यावेळी अजित पवार यांच्यासह विमानात असलेल्या पाच जणांचा देखील मृत्यू झाला आहे. दादांच्या निधनाच्या बातमीनंतर अनेक राजकीय नेतेमंडळींकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनीही भावना व्यक्त केल्या आहेत. रुपाली चाकणकर यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटलं कि, आमच्या राष्ट्रवादी परिवारावर आज दुःखाचा डोंगर कोसळला, दादा नावाच्या व्यक्तीच्या सावलीत असणाऱ्या आम्हा सर्वांना काळाने पोरकं केलं. आमच्या डोक्यावरील आधाराची आणि मायेची सावलीच हिरावून घेतली, असं त्यांनी म्हटलं आहे. तसेच सूर्याच्या साक्षीने दादांचे काम सुरू व्हायचे काम घेऊन येणाऱ्या प्रत्येक माणसाला दादा आपले काम करतील हा विश्वास वाटायचा हीच दादांची ओळख होती. दादा स्पष्टपणे जितके बोलायचे त्याच्या कैक पटीने जास्त त्यांच्या मनात प्रत्येकाबद्दल आदर आणि आपुलकी असायची.

# फ्लिपकार्ट तर्फे नव्या मार्केटप्लेस गव्हर्नन्स फ्रेमवर्कची सुरुवात




पुणे (दै. संध्या) :

फ्लिपकार्ट या भारतातील होमग्रोन ई कॉमर्स मार्केटप्लेस ने गुंतवणूकीत वाढ करण्यास सुरुवात केली असून त्याकरता कॉम्प्लायन्स फ्रेमवर्कच्या माध्यमातून प्लॅटफॉर्मवरून योग्यता आणि विश्वसनीयता वाढवण्यावर जोर दिला आहे. या पध्दतींचे डिझाईन हे सातत्यपूर्ण स्तर, अंतर्गत नियंत्रण आणि ऑडिटसाठी तयार प्रक्रियांचा अवलंब केला जाणार आहे. या संभाषणात्मक, स्तरांवर आधारीत दृष्टिकोना मुळे आता १.४ दशलक्ष विक्रेत्यांसह कोट्यावधी लिस्टिंग्ज समोर येऊ लागली आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि संरचनात्मक मानवी दृष्टिकोनासह औपचारिक स्पर्धात्मक योजनांचा अवलंब करण्यात येणार आहे. फ्लिपकार्ट ने आपली विश्वसनीयता टिकवून ठेवत योग्य पध्दतीच्या नियमनाने योग्य व्यवसाय होऊन ग्राहकांना सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण उत्पादने प्राप्त होऊ शकतील.

फ्लिपकार्टची पहिली बचावफळी ही एक प्रमाणित, जोखमीवर आधारित ऑनबोर्डिंग आणि देखरेख प्रणाली आहे जी अनुपालन न करणाऱ्या आणि फसव्या विक्रेत्यांना प्लॅटफॉर्मवर प्रवेश करण्यापासून किंवा काम करण्यापासून रोखण्यासाठी डिझाइन केलेली आहे.

फ्लिपकार्ट वरील नवीन सेलर्स ऑनबोर्डिंग मुळे धोक्यावर आधारीत तपासणीने युक्त मॉडेल हे कागदपत्रे सबमिट करण्याच्या पुढे जाऊन काम करते. जीएसटीआयएन आणि पॅन चेकिंगच्या पुढे जाऊन ऑनबोर्डिंग सिस्टम ही विक्रेत्यांची तपासणी करुन पत्ता आणि पिनकोडची तपासणी ही विक्रेत्यांची तपासणी करतात. जीएसटी चे सर्व घटक हे टू फॅक्टर ऑथेटिकेशन ने तपासतात ज्यामुळे त्यांचा गैरवापर होत नाही. यामुळे फ्रॉड लिंकेज ॲनालिसिस होऊन विक्रेत्यांना बदल करुन पुन्हा मंचावर प्रवेश करता येत नाही.

फ्लिपकार्टचे देखरेख आर्किटेक्चर एआय-वर आधारीत स्केलला मानवी पर्यवेक्षण आणि ऑडिटेबिलिटीसह जोडते, त्यामुळे हे सुनिश्चित करते होते की ऑटोमेशन दस्तऐवजांचे पुनरावलोकन, ऑडिट ट्रेल्स आणि एस्केलेशन प्रोटोकॉल्स आता एकत्रित केलेले आहे. कंपनीचे रिअल-टाइम उल्लंघन स्कॅनिंग सिस्टम डिटेक्शन मॉडेल्स वापरून उत्पादनांवरील मजकूर आणि लोगो उल्लंघन ओळखते, ज्यामुळे मॅन्युअल प्रमाणीकरण होते आणि त्यानंतर पुष्टी झालेल्या उल्लंघन करणाऱ्या वस्तूंची यादी काढून टाकली जाते. याव्यतिरिक्त, मार्केटप्लेस गुणवत्ता नियंत्रण टीम संबंधित नियामक आवश्यकतांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी दरमहा लाखो सूची स्कॅन करते. तंत्रज्ञान-आधारित उपायांव्यतिरिक्त, फ्लिपकार्ट ऑन-ग्राउंड विक्रेता तपासणी आणि जिओ-टॅग करून पत्त्याची पडताळणी केली जाते,ज्यामध्ये विशिष्ट विक्रेत्यांचे अचानक ऑडिट केले जाते, ज्यामुळे उच्च निरीक्षण सूचित केले आहे.

संपूर्ण इकोसिस्टममध्ये दक्षता वाढवण्यासाठी, फ्लिपकार्ट तर्फे अंतर्गत कर्मचारी मोहीम देखील सुरू केली आहे ज्यामुळे कर्मचाऱ्यांना बनावट सूची आणि मल्टी-अकाउंट गैरवापर ते रिटर्न मॅनिपुलेशन आणि प्रमोशनल फसवणूक अशा विक्रेते किंवा ग्राहकांच्या गैरवापराच्या पद्धती ओळखण्यास आणि त्यांची तक्रार करण्यास सक्षम करते.

केंद्रिय अशा या फ्रेमवर्किंग मुळे संस्थात्मकतेनेमुळे पारदर्शिता मिळून विक्रेत्यांना योग्य प्रक्रियांचा वापर करता येतो. ऑनबोर्डिंग मुळे विक्रेत्यांना योग्य सर्वसमावेशक स्नॅपशॉट मुळे सेलर टर्म ऑफ युझर्स वापर करणे आवश्यक असते. सातत्यपूर्ण जागरुकते मुळे दरमहिन्याला फ्लायर्स, प्री फेस्टिव्हेल कॉन्क्लेव्ह्ज, थीम वर आधारीत वेबिनार्स, सर्वसमावेशक पॉलिसी संभाषणात्मक आणि वाढीव ट्रिगर संभाषण करणे शक्य होणार आहे. विक्रेत्यांना विश्वसनीय दृष्यमानता ही विश्वसनीय कोड्सचा वापर डॅशबोर्ड्सवर आधारीत मिळून अधिकृतता किंवा खरेदीचा पुरावा प्राप्त होण्यास मदत मिळते. फ्रेमवर्कचे नियमन हे विशेष निकषांसह, विश्वास आणि सुरक्षा तसेच बाजारपेठेतील धोकांचे नियम मिळून संरचनात्मक रिपोर्टिंग हे वरिष्ट नेतृत्वाकडून प्राप्त होणार आहे.

फ्लिपकार्टच्या प्रशासन प्रणालीमध्ये केवळ प्रतिक्रियात्मकता काढून टाकण्याऐवजी लवकर इंटरसेप्शनवर लक्ष केंद्रित करतात. ऑक्टोबर २०२४ ते ऑक्टोबर २०२५ दरम्यान, मूळ ठिकाणी बनावट किंवा अनुपालन धोरण उल्लंघनासाठी १ कोटींहून अधिक सूचींवर कारवाई करण्यात आली आणि १३,००० विक्रेत्यांना प्लॅटफॉर्मवरून काढून टाकण्यात आले. शिवाय, फ्लिपकार्टचा 'ब्रँड ॲश्योर' कार्यक्रम ट्रेडमार्क-नोंदणीकृत ब्रँड मालकांना अनधिकृत सूची किंवा विक्रेत्यांना फ्लॅग करण्यास सक्षम करतो, ट्रस्ट आणि सेफ्टी टीम रिअल टाइममध्ये नोंदवलेल्या घटनांचा आढावा घेते. डिसेंबर २०२५ पर्यंत, या कार्यक्रमाने ११,००० हून अधिक ब्रँडना ऑनबोर्ड केले आहे आणि ब्रँड नेम, कॉपीराइट, डिझाइन आणि लोगो उल्लंघनांसह हजारो उल्लंघनाच्या घटनांचे निराकरण करण्यास मदत केली आहे. या उपक्रमामुळे ऑनबोर्ड केलेल्या ब्रँडसाठी ग्राहकांनी नोंदवलेल्या बनावटींमध्ये लक्षणीय घट झाली आहे. सुसंगतता, प्रमाण आणि योग्य प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी या कृती दस्तऐवजीकृत अंमलबजावणी प्रोटोकॉलद्वारे अंमलात आणल्या जातात.

फ्लिपकार्टच्या मार्केटप्लेसचे प्रमुख आणि सिनियर व्हाईस प्रेसिडेंट साकेत चौधरी यांनी सांगितले “ फ्लिपकार्टच्या कार्यामध्ये नेहमीच विश्वसनीय आणि सर्वनियमांनुसार काम करणे ही प्रथम गोष्ट आहे. आम्ही सातत्याने अजोड नियामक फ्रेमवर्क करण्यामध्ये गुंतवणूक करत असून याकरता तंत्रज्ञानावर आधारीत धोक्याचा अभ्यास करुन रिअल टाईम मॉनिटरींग करत असतो. या सर्वसमावेशक दृष्टिकोनासह सक्षम पध्दतींचा वापर करुन योग्य विक्रेता भागीदारांमुळे ग्राहकांना सुरक्षित, गुणवत्तापूर्ण आणि तपासलेली उत्पादने उपलब्ध करून आम्ही देत असतो. सक्षम अशा मार्केटप्लेस मुळे विश्वसनीयते सह सक्षम, मोठ्या प्रमाणावरील डिजिटल मंचाचा दीर्घकालीन उपयोग आम्ही निर्माण करु शकू.”

कंपनी तर्फे नियामक पध्दतींमध्ये गुंतवणूक करण्यात येणार असून यामुळे पारदर्शक आणि विश्वनीय डिजिटल मंच निर्माण करण्यासाठी सक्षम निकषांनुसार एक सक्षम डिजिटल मार्केटप्लेस बनण्याच्या दिशेने काम करण्यात येणार आहे.

**थोडक्यात पण महत्वाचे...**




## ज्ञानवर्धिनी विद्यालयाचे वाचन स्पर्धेत यश

चाकण (दैनिक संध्या) : कलापिनी व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कै. बाळासाहेब गद्रे स्मृती नाट्य वाचन स्पर्धेत येथील ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन घवघवीत यश संपादन केले. पहिल्या विभागात " गड आला पण सिंह गेला " या नाटकात साक्षी शिवाजी गुरव या विद्यार्थिनीला वाचन अभिनयात उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. दुसऱ्या विभागात " काही झाले तरी थांबायचे नाही " या नाटकाला सांघिक तृतीय क्रमांक मिळाला. या नाटकात लताबाईंचे पात्र करणाऱ्या स्वरा गणेश रेपाळे या विद्यार्थिनीला उत्कृष्ट अभिनया बद्दल तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. प्रणित गिरासे, स्वरा रेपाळे, रेवा वाबळे, हिमांशू साबळे, सुदर्शन चौंडे, स्वरा पाटील, जकोजी जाधव यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. उर्मिला कोबल यांनी नाट्य लेखन, तर अर्चना माळी यांनी दिग्दर्शन केले. नितिन शिंदे यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे आदींनी सर्व गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले.

## 14 मार्च 2026 रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

जुन्नर (दैनिक संध्या) : दि. १४ मार्च २०२६ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय जुन्नर येथे व जिल्हा न्यायालय व जिल्हयातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार, राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये (Pre-litigation) दाखलपूर्व प्रकरणे, विज व पाणी बिल देयके, बँक कर्ज वसुली प्रकरणे, मोटार वाहन अपघात दावे, कौटुंबिक वाद, मालमत्ता विवाद, कर्मचारी नुकसान भरपाई प्रकरणे व इतर दिवाणी व फौजदारी तडजोड योग्य प्रकरणे या तडजोडीने निकाली काढले जातात. लोकअदालतीमध्ये प्रलंबित प्रकरणे तडजोडीने निकाली निघाल्यामुळे दोन्ही पक्षांचा विजय होतो. तडजोडीने झालेल्या निर्णयानुसार न्यायालयीन फिस पक्षकाराला परत मिळते. पक्षकारांच्या वेळेची बचत, कमी खर्च व त्वरीत न्याय मिळतो. ज्या पक्षकरांना त्यांची प्रकरणे लोकन्यायालयात ठेवावयाची आहेत. त्यांनी संबंधित न्यायालयाशी अथवा जुन्नर तालुका विधी समिती यांचेशी संपर्क साधावा.व शनिवार दि.१४ मार्च २०२६ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय जुन्नर येथे आयोजित केलेल्या लोक अदालतीचा लाभ घ्यावा.असे आवाहन करण्यात आले आहे. लोकन्यायालयाचे फायदे : जलद आणि मोफत न्याय: खटले लवकर मिटतात आणि कोणतीही कोर्ट फी भरावी लागत नाही. कोर्ट फी परत: जर प्रलंबित खटला लोकन्यायालयात मिटवला, तर पूर्वी भरलेली कोर्ट फी परत मिळते. समेट (Compromise): दोन्ही पक्षांच्या संमतीने निर्णय होत असल्याने भविष्यात संबंध खराब होत नाहीत.

# पुण्यात एडब्ल्यूआरटी फेस्टीव्हलचे आयोजन

**पुणे (दै. संध्या) :**



पालवीया फाऊंडेशन तर्फे व भाग्यशाली भविष्य शिक्षण फाऊंडेशन यांच्या सहकार्याने एडब्ल्यूआरटी या कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हे या महोत्सवाचे दुसरे वर्ष असून हा अनोखा कार्यक्रम 31 जानेवारी आणि 1 फेब्रुवारी 2026 रोजी दुपारी 11 ते सायंकाळी 6.30 दरम्यान पुण्यातील गेणू भाऊ खेसे प्राथमिक विद्यालय,बर्मा शेल वस्ती,509 चौक, एअरपोर्ट रोड येथे संपन्न होणार आहे. या फेस्टीव्हलमध्ये कलेच्या माध्यमातून विकासाचा सर्वसमावेशक उत्सव साजरा करण्यासाठी लहान मुले,कलाकार आणि समुदाय एकत्र येणार आहेत. एडब्ल्यूआरटी हा वंचित मुलांसाठी एक वस्तीमध्ये आयोजित केलेला एक कला महोत्सव आहे.विविध वस्त्या आणि अनाथाश्रमातील मुले आपली सर्जनशील कला सादर करण्यासाठी एकत्र येणार आहेत. हा महोत्सव सर्वांसाठी खुला आहे.

या महोत्सवाचे उद्‌घाटन शनिवार,31 जानेवारी 2026 रोजी दुपारी 1 वाजता नगरसेविका ऐश्वर्या पठारे यांच्या हस्ते करण्यात येणार असून यावेळी नवज्योती इंडिया फाऊंडेशनच्या उपाध्यक्ष साईना भरूचा व अमुक-तमुकचे सहसंस्थापक ओमकार जाधव उपस्थित राहणार आहेत.

एडब्ल्यूआरटी महोत्सव हा वस्तीमध्ये साकारलेला समुदायाआधारित कला महोत्सव आहे. वंचित समुदायातील मुलांनी कलेशी जोडले राहून विकसित केलेली कला,कौशल्ये आणि संकल्पना या महोत्सवात सादर केले जाणार आहेत.यंदाच्या महोत्सवात बर्मा शेल वस्तीबरोबरच बालग्राम एसओएस चिल्ड्रन्स व्हिलेज तसेच इतर वंचित समुदायातील मुलेही सहभागी होत आहेत.यामध्ये अनाथाश्रमातील मुलांचाही समावेश आहे. या महोत्सवात बालपणातील विविध अनुभव एकाच मंचावर सामुहिक व कलात्मक पध्दतीने अनुभवता येणार आहेत.

या दोन दिवसीय महोत्सवात बर्मा शेल बस्ती आणि इतर आसपासच्या परिसरातील कलाकारांचे सादरीकरण होणार असून मुलांचे नृत्य,सामूहिक गीत सादरीकरण,कथानाट्य, सर्जनशील विचार व कलात्मक अभिव्यक्ती,मास्क मेकिंग आणि मेमरी पपेट यांच्या कार्यशाळा,सितार वादन,भरतनाट्यम व मोहिनी अट्टम,रॅप सादरीकरण आणि लाईव्ह बँड परफॉर्मन्स अशा विविध कलाकृतींचे प्रदर्शन पाहता येणार आहे.

याप्रसंगी बोलताना पालवीया फाऊंडेशन आणि नुक्कड कॅफेचे संस्थापक वैभव पालिवाल म्हणाले की, कला ही मुलांच्या वाढीला,त्यांच्या स्वप्नांना आणि भविष्यातील कल्पनांना आकार देण्याचे एक सुंदर माध्यम आहे. सातत्यपूर्ण सर्जनशील सहभागातून आम्ही वंचित समुदायांतील मुलांमध्ये आत्मविश्वास आणि दृष्टीकोन विकसित करण्याचे काम करत असून हा फेस्टीव्हल त्या प्रवासाचा सामुदायिक उत्सव आहे.या महोत्सवाच्या माध्यमातून कलाकार,मुले आणि समुदाय एकत्र येऊन हा अनुभव साजरा करताना पाहणे हे अत्यंत प्रेरणादायी आहे.

बर्मा शेल वस्ती येथील नर्सिंग विद्यार्थिनी व मराठी,हिंदी व इंग्रजी या तीनही भाषांवर प्रभुत्व असलेल्या सानिया शेख या सूत्रसंचालन करणार आहेत.

या दोन दिवसीय महोत्सवात कला प्रदर्शनही आयोजित करण्यात येणार असून वंचित समुदायातील मुलांनी तयार केलेली चित्रे आणि कलाकृती प्रदर्शित केल्या जातील.



## विद्यार्थ्यांचा ‘स्नेहतरंग’ सोहळा उत्साहात

**भोकर (दै. संध्या) :**

भोकर येथील प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेच्या सन १९९६ ते २००६ (इयत्ता पहिली ते दहावी) या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा ‘स्नेहतरंग’ सोहळा उत्साहात पार पडला. तब्बल २५ वर्षांनंतर एकत्र आलेल्या मित्र–मैत्रिणींनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक सुरज केंद्रे होते. यावेळी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक घुगे सर व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक कांगणे सर उपस्थित होते. आदरणीय शिक्षकांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले. माजी विद्यार्थ्यांनी गुरुजनांचा सन्मान करत कृतज्ञता व्यक्त केली. या सोहळ्याच्या निमित्ताने शाळेला सामूहिक प्रतिमा भेट देण्यात आली तसेच ‘एक झाड – एक विद्यार्थी’ उपक्रमांतर्गत शाळेच्या परिसरात ७० झाडांची लागवड करण्यात आली. ही लागवड माजी विद्यार्थी व विभागीय वन अधिकारी संदीप बाबू चव्हाण यांच्या सहकार्याने झाली. स्नेहभोजनाचे आयोजन माजी विद्यार्थी व उद्योजक अविनाश अमिलकंठवार यांच्या मदतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय खंदारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# अजित पवारांच्या निधनाने वाल्हे परिसरात शोककळा

**वाल्हे (दै. संध्या) :**




महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर वाल्हे ( ता. पुरंदर) परिसरात शोककळा पसरली यावेळी ग्रामस्थांनी कडकडीत बंद पुकारून दुखवटा व्यक्त केला. सकाळच्या प्रहरी वृत्तवाहिन्यांवर अजित पवारांच्या चार्टर्ड विमानाला अपघात झाल्याची बातमी झळकताच अनेकांनी धसका घेतला होता.

सर्वांचे लाडके दादा आपल्यात नाहीत, महाराष्ट्राच्या विकासासाठी बरच काही करणारा आणि करु शकणारा कार्यसम्राट नेता आपल्यातून आज निघून गेलाय यावर ग्रामस्थांचा विश्वास लवकर बसतच नव्हता.परंतु उपमुख्यमंत्री अजित पवारांची अकाली एक्झिट खरच महाराष्ट्राच्या प्रत्येक जनमनाला चटका लावणारी असल्याने या घटनेनंतर वाल्हे गावात बंद पुकारण्यात आला. गावातील गावकऱ्यांनी स्वतःहून पुढे येत बंदचा निर्णय घेतला. यावेळी काहींना अश्रू अनावर झाले होते तर काही कार्यकर्ते थेट बारामतीच्या दिशेने रवाना झाले.

या दरम्यान, होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या निमित्ताने आखलेले सर्व नियोजित दौरे, प्रचार सभा, घोंगडी बैठका सर्वपक्षीय नेत्यांनी रद्द केल्या. शिवाय अजित पवारांच्या दुःखद निधनाच्या बातमीने त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी व ग्रामस्थांनी हळहळ व्यक्त केली .

यावेळी, पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा.डॉ.दिगंबर दुर्गाडे यांच्या घरी पुरंदर तालुक्यातील अनेक कार्यकर्ते, नेते मोठ्या संख्येने जमा झाले होते. यावेळी प्रा. दुर्गाडे यांसह उपस्थितांना अश्रू अनावर झाले होते.'आपले दादा गेले' अशी प्रतिक्रिया तसेच निशब्द भावना प्रत्येकांच्या चेहऱ्यावर उमटली होती. यावेळी प्रत्येकांच्या डोळ्यातून अश्रू तरळले होते. दरम्यान,अनेक कार्यकर्त्यांनी अजितदादां सोबतच्या आठवणी बोलून दाखवल्या.विकासाठी धमक असणारा नेता हरपला, अजित पवार यांच्या निधनाने ' आता आपण पोरके झालो आहोत' अशी भावना व्यक्त केली. त्यांच्यासोबत व त्यांच्या पक्षात काम केलेल्या अनेक कार्यकर्त्यांचे या घटनेमुळे राजकीय मनोधैर्य खचून गेले आहे.

## ह. भ. प. शब्दप्रभू नरेंद्र महाराज गुरव यांच्या किर्तनाने भाविक मंत्रमुग्ध

**नांदेड जिल्हा (दै. संध्या) :**




कै. मारोतराव होनाजी हंबर्डे यांच्या पुण्यतिथीनिमित्त दि रह जानेवारी सोमवार रोजी सकाळी १० वा. ह.भ.प. शब्दप्रभू नरेंद्र महाराज गुरव यांचा भव्य कीर्तन सोहळा पार पडला. कै. मारोतराव होनाजीराव हंबर्डे यांनी आयुष्यभर वारकरी संप्रदायाचा प्रसार व प्रचार केला. देव देश धर्माची सेवा केली. त्यांच्या स्मरणार्थ गेल्या १४ वर्षापासून हंबर्डे परिवाराच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. दि २६ जानेवारी रोजी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित ह.भ.प. शब्दप्रभू नरेंद्र महाराज (मालेगाव,नाशिक) यांच्या अमृतवाणीतील कीर्तनाचा लाभ घेण्यासाठी पालकमंत्री अतुल सावे, खासदार डॉ. अजित गोपछडे, ज्येष्ठ नेते भास्करराव पाटील खतगावकर , हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर संघटन मंत्री संजय कोडगे,आ. प्रताप पाटील चिखलीकर, आ.बालाजी कल्याणकर,आ. आनंद बोढारकार,भाजपा महानगर अध्यक्ष अमर राजूरकर,माजी आ ओमप्रकाश पोकर्णा ,जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, चैतन्य बापू देशमुख यांच्यासह आजी -माजी खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी,नवनिर्वाचित नगरसेवक तसेच जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आध्यात्मिक, आर्थिक, औद्योगिक, व्यापार आणि विविध क्षेत्रांतील सर्व मान्यवर, हंबर्डे परिवारावर प्रेम करणारा परिवार हजारोंच्या संख्येने उपस्थित होता. सहयोग एज्युकेशन कॅम्पस येथे आयोजित या भव्य दिव्य सोहळ्याचे भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ .संतुक हंबर्डे व परिवाराच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. ह.भ.प. शब्दप्रभू नरेंद्र महाराज गुरव यांच्या सुश्राव्य व समाज प्रबोधनात्मक कीर्तनाने उपस्थित मंत्रमुग्ध झाले होते. तत्पूर्वी पालकमंत्री अतुल सावे,खासदार डॉ. अजित गोपछडे व संघटन मंत्री संजय कोडगे यांच्यासह अनेक मान्यवरांनी मारोतराव होनाजी हंबर्डे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ह.भ.प. शब्दप्रभू नरेंद्र महाराज गुरव यांचा आशीर्वाद घेतला. दु १ ते सायं ६ वा. पर्यंत हजारो नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न

**नांदेड (दै. संध्या) :**

पीएमश्रीजिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी ही शाळा जिल्ह्यातच नाही तर मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात लातूर विभागात प्रथम आलेली सर्वगुणसंपन्न शाळा असून, ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहणाचा कार्यक्रम डॉ.संतबाबा हरजिंदर सिंघजी यांच्या उपस्थितीत अतिशय थाटात संपन्न झाला. महाराष्ट्र शासनाच्या सामूहिक कवायत उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी सामूहिक कवायतीचे सादरीकरण केले आणि या सामूहिक कवायतीचे ड्रोन द्वारे शूटिंग करण्यात आली. विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालय पुणे येथील शिक्षण उपसंचालक शिंदे, शिक्षणाधिकारी योजना दिलीप बनसोडे, गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती नांदेड सुधीर गुट्टे, यांची प्रमुख उपस्थिती होती. यानंतर माजी आमदार मोहन हंबर्डे यांच्यातर्फे त्यांचे वडील कै.मारोतराव होनराव हंबर्डे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या मातोश्री राधाबाई मारोतराव हंबर्डे यांच्या उपस्थितीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे मोहन मारोतराव हंबर्डे यांच्यातर्फे गेल्या १४ वर्षापासून त्यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ इंग्रजी विषयांमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास २१ हजार रोख रक्कम बक्षीस्वरूपी देऊन दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार करण्यात येतो.

### पहिल्याच वर्षातील अभूतपूर्व यशानंतर क्राफ्टन इंडिया 2026 साठी ‘रायझिंग स्टार्स’ प्रोग्रामसह सज्ज

# भारतातील ईस्पोर्ट्स क्रिएटर पाईपलाइनला नवे बळ

**पुणे (दै. संध्या) :**




पहिल्या वर्षात प्रत्यक्ष प्रभाव आणि आकर्षक वाढीची यशोगाथा नोंदवल्यानंतर, क्राफ्टन इंडिया ने आज क्राफ्टन इंडिया ईस्पोर्ट्स रायझिंग स्टार्स प्रोग्राम 2026 साठी नोंदणी सुरू करण्याची घोषणा केली आहे. हा कार्यक्रम देशभरातील तळागाळातील ईस्पोर्ट्स टैलेंट वाढवण्यासाठी कंपनीच्या दीर्घकालीन प्रतिवद्धतेला बळकटी देतो. दुसऱ्या कोहोर्टसाठी नोंदणी 20 जानेवारी 2026 पासून 20 फेब्रुवारी 2026 पर्यंत खुली राहील. निवडलेले रायझिंग स्टार्स नोंदणी कालावधी संपल्यानंतर BGIS 2026 दरम्यान क्राफ्टन इंडिया च्या ऑफिशियल सोशल मीडिया चॅनेल्सवर जाहीर केले जातील आणि वर्षाच्या उर्वरित भागात ऑनबोर्ड केले जातील.

रायझिंग स्टार्स प्रोग्राम 2026 दीर्घकालीन ईकोसिस्टम तयार करण्याच्या उद्देशाने एक व्यापक आणि अधिक संरचित चौकट सादर करते. या कार्यक्रमात दोन स्तरांवर नवीन रायझिंग स्टार्सचा समावेश केला जाईल: एलिट रायझिंग स्टार्स आणि बॅकअप रायझिंग स्टार्स.

एलिट रायझिंग स्टार्स ला स्ट्रीमिंग डिव्हाइस असिस्टन्स, रूम कार्ड्स आणि अतिरिक्त परफॉर्मन्स, दृश्यमानता आणि इकोसिस्टम फायदे यासारखे इकोसिस्टम सपोर्ट मिळेल. बॅकअप रायझिंग स्टार्सना रूम कार्ड सपोर्ट मिळेल आणि ते प्रोग्राममध्ये तयार टॅलेंट पूल म्हणून काम करतील. जबाबदारी आणि प्रोग्रामची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी परफॉर्मन्स बेंचमार्क असतील आणि आवश्यक असल्यास उच्च कामगिरी करणाऱ्या बॅकअप रायझिंग स्टार्सना एलिट ग्रुपमध्ये बढती देण्याची तरतूद असेल. क्राफ्टन इंडिया ईस्पोर्ट्स दरवर्षी अनेक समर्पित रायझिंग स्टार्स स्पर्धा आयोजित करण्याची योजना आखत आहे, ज्यामुळे रायझिंग स्टार्स आपल्या टीमसोबत पुरस्कारांसाठी स्पर्धा करू शकतील आणि संरचित टुर्नामेंट अनुभव मिळवू शकतील. या उपक्रमाबद्दल भाष्य करताना, क्राफ्टन इंडिया चे ईस्पोर्ट्सचे असोसिएट डायरेक्टर करण पाठक म्हणाले: “जसे जसे भारतातील ईस्पोर्ट्स क्षेत्र वाढत आहे, क्रिएटर्सना फक्त तात्पुरती प्रसिद्धी नव्हे तर सातत्य, स्पर्धात्मक महत्व आणि स्पष्ट वाढीचे मार्ग हवे आहेत. रायझिंग स्टार्स 2026 सोबत, आम्ही एक अधिक संरचित आणि प्रदर्शन-आधारित कार्यक्रम तयार केला आहे जो समर्पण आणि प्रगतीला पुरस्कृत करतो. स्तरीय समर्थन, नियमित स्पर्धात्मक संधी आणि स्पष्ट बेंचमार्क देऊन, आम्ही एक स्केलेबल पाइपलाइन तयार करत आहोत जी उदयोन्मुख टॅलेंटला सातत्याने वाढण्यास आणि तयार झाल्यावर प्रगती करण्यास अनुमती देते. हा कार्यक्रम भारताच्या ईस्पोर्ट्स इकोसिस्टमला तळागाळातून मजबूत करण्याच्या आमच्या दीर्घकालीन दृष्टिकोनाला प्रतिबिंबित करतो.”

2025 मध्ये सुरू केलेल्या रायझिंग स्टार्स प्रोग्राम ची संकल्पना उदयोन्मुख ईस्पोर्ट्स खेळाडू आणि गेमिंग कंटेंट क्रिएटर्स ओळखणे आणि त्यांचा विकास करण्यासाठी केली गेली, ज्यात संरचित मार्गदर्शन, ईकोसिस्टम समर्थन आणि सातत्यपूर्ण विकासाच्या संधींचा समावेश होता. पहिल्या उद्‌घाटन कार्यक्रमात सात आशादायक ईस्पोर्ट्स खेळाडू आणि क्रिएटर्स सहभागी झाले, जसे की नूबपरी, शिराज, झालाईकम, सौमराज, मर्नोक्स, सॅम, आणि एव्हिल, ज्यांनी वर्षभरात उल्लेखनीय प्रगती दर्शवली.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः गावं मौजे आर्वी गुजाळवाडी, तालुका जुन्नर, जि. पुणे व परिसरातील लोकांस आमचे आशिल क.१. कुमारी युतीका प्रतिक भागवत, क. २. सी. ऐश्वर्या प्रतिक भागवत नं.२ स्वतःकरिता व नं.१ ची अ.पा.क. जनकमता म्हणुन रा. ओझर, तालुका जुन्नर, जि. पुणे यांनी प्रत्यक्ष सांगितल्यावरून व दिलेल्या माहिती प्रमाणे जाहीर रित्या कळविण्यात येते ते येणेप्रमाणे,

खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती आमचे आशिलांचे हिंदु एकत्र कुटुंवाचे वडिलोपार्जीत मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताव्यातील मिळकती आहेत. सदर मिळकतींचे अदयाप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही असे असताना सदरहु मिळकतींवावत कुटुंवास कुठल्याही प्रकारची कायदेशिर व नैसर्गिक अडचण नसताना आमचे आशिल क. १ चे वडील व नं. २ यांचे पती श्री. प्रतिक धनंजय भागवत तसेच आमचे आशिल क. १ यांची आजी व नं. २ यांची सासु श्रीमती मंजुषा धनंजय भागवत रा. देहुगाव, आळंदी रोड, ता. हवेली, जि. पुणे हे सदर मिळतींचे ७४१२ उता-याचे मालक सदरी असलेल्या स्वतःचे नावाचा गैरफायदा घेवुन सदर मिळकती विकी करण्याच्या जोरदार प्रयत्नात असलेवावत आमचे आशिलांस नुकतेच समजले आहे.

तरी सर्व लोकांस अशी समज देण्यात येते की, खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींच्या संदर्भात श्री. प्रतिक धनंजय भागवत व श्रीमती मंजुषा धनंजय भागवत रा. देहुगाव, आळंदी रोड, तालुका हवेली, जि. पुणे यांचेवरोवर कोणीही खरेदी-विकी, दान, गहान, लिज, वक्षिस, अगर अन्य कुठल्याही प्रकारे तवदिलीचा व्यवहार करू नये.

तद्वत सदरहु इसमास खाली वर्णन केलेल्या मिळकतीवर कुठल्याही प्रकारचा पतपुरवठा करू नये व त्या अनुशंगाने करार मदार करू नये अन्यथा तसले कुठलेही व्यवहार करार मदार आमचे आशिलांचे खाली वर्णन केलेल्या मिळकती मधील मालकीवर व ताव्यावर बंधनकारक राहणार नाहीत व संबंधीत व्यक्तीस मिळकतीची मालकी व तावा मिळणार नाही हयाची नोंद घ्यावी. कुणाचीही फसवणुक होवु नये म्हणुन आगावु सदरची नोटीस प्रसिध्दिस दिली असे.

**परिशिष्ट**

अ. मिळकतींचे वर्णन तुकडी पुणे पो. तु. गुजाळवाडी आर्वी येथील मे दुय्यम निबंधक सो. नारायणगावं यांचे हद्दीतील तसेच जिल्हा परिषद पुणे पंचायत समिती जुन्नरचे हद्दीतील ग्रामपंचायत गुजाळवाडी आर्वीचे हददीतील मिळकती.

| अ. नं. | ग. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १. | २०१० | ०.२७ | १.६० |

यापैकी सामाईकातील अर्ध्या हिश्याच्या शेतजमीनी

येणेप्रमाणे मिळकती व त्यातील झाडझरोडा, लाकुडफाटा, माती, दगड धोंडा, जलतरंग वरतुमहीत तसेच सदर मिळकतींमध्ये सर्व प्रकारचे वहीवाटीचे हक्क, जाण्यायेण्याचे हक्क व अधिकारासहीत तसेच कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार राखुन न ठेवता दरोवस्त .

ब. मिळकतीचे वर्णन : तु.व.जि.पुणे पो.तु.ता.जुन्नर जि. पुणे येथील मे. सव रजि. सो. नारायणगावं यांचे हद्दीतील व जिल्हा परिपद पुणे व पंचायत समिती जुन्नर यांचे हद्दीतील गावं मौजे गुंजाळवाडी आर्वी ता. जुन्नर जि. पुणे येथील वडीलोपार्जीत मालकी वहीवाटीचे व तावेवहीवाटीस असलेले व कायदेशिर स्वामीत्व असलेली घर मिळकत .

| ग्रा.मि.नं. | मिळकतीचे वर्णन |
|---|---|
| ०६/०१२/०१९३ | आर सी. सी. पध्दतीचे घर पूर्व मुखी स्लॅब (लांबी १७.०० x रूंदी २६.००) |

येणेप्रमाणे वर्णनाचे चर्तुसिमापुर्वक घर मिळकत त्यातील सामान, जलतरंग वस्तुसहीत सदर जागेमध्ये जाण्यायेण्याचे हक्क व अधिकारसुध्दा. तसेच त्यामध्ये असणारे पाणी वीज कनेक्शनसह कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार राखुन न ठेवता दरोवस्त.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दिनांक : २९.०१.२०२६

**ॲड. रत्ना रामचंद्र हांडे,**
**मो.नं. ९८६०४४०४६५/९३२२८३११११२**

## शुध्दीपत्रक क्र. १

का. अ., को. बां. वि. क्र.१, कोयनानगर ता. पाटण, जि. सातारा, पिन - ४१५२०७

**ई निविदा सुचना क्र. ०२ सन २०२५-२६**

"महाराष्ट्र शासन हे रत्नागिरी जिल्ह्यातील पात्र मजूर सहकारी संस्थाकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत"

**च्याऐवजी**

"महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत"

असे वाचावे याची संबंधितांनी नोंद घ्यावी. दि.२८.०१.२०२६ रोजी शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in प्रसिध्द झालेल्या ई-निविदा सुचनेत इतर तपशिलामध्ये कोणताही बदल नाही.

**जा. क्र. कोबांविक्र.१/लेशा-५/१०२/सन २०२६**
**दिनांक : २८/०१/२०२६**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### विकासाचा "दादा" माणूस हरपला – आमदार अमित गोरखे

पिंपरी (दैनिक संध्या) : राजकीय क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व आमदार अमित गोरखे यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावनिक श्रद्धांजली अर्पण करणारा संदेश सोशल मीडियावर शेअर केला आहे. या संदेशामध्ये त्यांनी अजित पवार यांच्या सार्वजनिक जीवनातील योगदान, लोकाभिमुख नेतृत्व आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख केला आहे. अमित गोरखे यांनी आपल्या श्रद्धांजली संदेशात म्हटले आहे की, स्पष्टवक्तेपणा, ठाम निर्णयक्षमता आणि जनतेशी असलेले नाते यामुळे अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळे स्थान निर्माण केले. अर्थमंत्रीपदाच्या काळात राज्याच्या विकासासाठी, महिला सक्षमीकरण, शेतकरी कल्याण आणि युवकांसाठी राबवलेल्या योजनांचे योगदान अतुलनीय असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. ते खऱ्या अर्थाने विकासाचे दादा होते. या भावनिक संदेशात त्यांनी पवार कुटुंबीयांप्रती तसेच कार्यकर्त्यांप्रती संवेदना व्यक्त करत, "ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो," अशी प्रार्थनाही व्यक्त केली आहे.



### महापालिकेत अधिकारी- कर्मचाऱ्यांकडून अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी महापालिका मुख्यालयात अधिकारी कर्मचाऱ्यांच्या वतीने शोकभावना व्यक्त करण्यात आली. आशिया खंडातील श्रीमंत महानगरपालिका म्हणून पिंपरी-चिंचवडची ओळख निर्माण करण्यात आणि शहराचा सर्वांगीण कायापालट करण्यात अजितदादा पवार यांचा मोलाचा वाटा असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. प्रशासनावर कडक शिस्त ठेवतानाच अधिकारी व कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन काम करण्याची त्यांची कार्यपद्धती नेहमीच प्रेरणादायी राहिली असल्याचे मत अनेक कर्मचाऱ्यांनी मांडले. अजितदादा पवार यांच्याबाबत व्यक्त झालेल्या शोकभावनांमधून महापालिका प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा भावनिक सूर स्पष्टपणे दिसून आला.

### छ. शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्वच्या नियोजनासाठी गुरूवारी महापालिकेत बैठक



पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड शहरात प्रतिवर्षी १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या प्रमाणावर साजरी करण्यात येते. शहरातील अनेक शिवजयंती उत्सव मंडळे, विविध शैक्षणिक व इतर संस्था, ट्रस्ट, कामगार संघटना, व्यक्ती कार्यक्रमात सहभागी होतात, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरात विविध ठिकाणी शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व आयोजित करण्यात येते. यावर्षी १९ फेब्रुवारी २०२६ रोजी जयंती व प्रबोधन पर्व साजरे करण्याबाबत विचार विनिमय करण्यासाठी शहरातील शिवजयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष, विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, पोलिस प्रशासन, महापालिका अधिकारी आदी सर्वांची एक समन्वय बैठक अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवार २९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृह येथे आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीस संबंधित मान्यवरांनी उपस्थित रहावे असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.



### पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात 'नॉर्थईस्ट कम्युनिटी कनेक्ट' उपक्रम

पिंपरी (दैनिक संध्या) : पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी २०२६ रोजी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात 'नॉर्थईस्ट कम्युनिटी कनेक्ट' हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीत व्यवसाय व शिक्षणाकरिता वास्तव्यास असलेल्या उत्तर-पूर्व भारतातील नागरिकांशी संवाद वाढविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या अंतर्गत पोलीस आयुक्तालय व विविध पोलीस ठाण्यांमध्ये ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये उत्तर-पूर्व भारतातील सुमारे ७८ नागरिकांनी सहभाग घेतला. यानंतर आयोजित बैठकीत उत्तर-पूर्व भारतातील नागरिक व पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय, विशेष शाखा तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. या बैठकीत उत्तर-पूर्व नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या व त्यावर उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच, उत्तर-पूर्व नागरिकांशी नियमित संपर्कासाठी पोलीस आयुक्तालय स्तरावर विशेष शाखेतील पोलीस उप-आयुक्त यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बैठकीदरम्यान पोलीस आयुक्तालयातील डायल ११२, विविध हेल्पलाईन क्रमांक, तसेच मोबाईल ॲप्सबाबत माहिती देण्यात आली. यानंतर हा उपक्रम सांगवी, निगडी, चिंचवड, दापोडी, संत तुकाराम नगर, एमआयडीसी भोसरी, वाकड, रावेत आदी पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रातही राबविण्यात आला. या ठिकाणी झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रमात उत्तर-पूर्व भारतातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. एकूणच 'नॉर्थईस्ट कम्युनिटी कनेक्ट' हा उपक्रम पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात यशस्वीपणे पार पडला असून, यामुळे उत्तर-पूर्व राज्यांतील विद्यार्थ्यांमध्ये विश्वास, सुरक्षितता व समाजातील आपलेपणाची भावना अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

## अजितदादांसारखा धडाडीचा आणि कामाचा आवाका असणारा नेता पुन्हा होणे नाही : आ. महेश लांडगे

पिंपरी (दै. संध्या) :

अजितदादांसारखा असा धडाडीचा आणि कामाचा आवाका असणारा नेता पुन्हा होणे नाही. त्यांच्या जाण्यानं एक लोकाभिमुख व करारी नेतृत्व हरपलं आहे अशी भावना भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली आहे.

आमदार महेश लांडगे यांनी म्हटले आहे की, राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आज सकाळी झालेल्या विमान अपघातात दुःखद निधन झाले. त्यांच्या अकाली निधनाची बातमी अत्यंत दुःखदायक आणि अतिशय धक्कादायक आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. अजितदादांसारखा असा धडाडीचा आणि कामाचा आवाका असणारा नेता पुन्हा होणे नाही. त्यांच्या जाण्यानं एक लोकाभिमुख व करारी नेतृत्व हरपलं आहे. जनतेच्या प्रश्नांसाठी पहाटे सहा वाजेपासून तळमळीनं काम करणारे ते खरे लोकसेवक होते.



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली..!
**– महेश किसनराव लांडगे**
**आमदार, भाजपा,**
**पिंपरी-चिंचवड पुणे.**

राज्याच्या जडणघडणीत त्यांनी दिलेलं योगदान हा महाराष्ट्र कायम स्मरणात ठेवील. दादांचं अकाली जाणं हे त्यांच्या कुटुंबासह सर्व कार्यकर्त्यांसाठी मोठा धक्का आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. या दुःखद प्रसंगी पवार कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, ही परमेश्वरचरणी प्रार्थना करतो.

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत रंगत वाढली

पिंपरी (दै. संध्या) :

मावळ तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. बहुतेक ठिकाणी चुरशीच्या लढती होणार असल्याचे दिसून येत आहे. जिल्हा परिषदेच्या पाच गटांमधून १४ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यामुळे आता १३ उमेदवार निवडणूक रिंगणात उरले आहेत. तर पंचायत समितीच्या दहा गणांमधून २३ उमेदवारांनी माघार घेतली असून २७ उमेदवार रिंगणात राहिले आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण मिळून एकूण ३७ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी (प्रांत) सुरेंद्र नवले व सहाय्यक निवडणूक अधिकारी (तहसीलदार) विक्रम देशमुख यांनी दिली. जिल्हा परिषद गटांमध्ये इंदोरी, खडकाळा व सोमाटणे गटात भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) यांच्यात सरळ लढती होत आहेत. तर कुसगाव व टाकवे गटात तिरंगी लढती होत असून येथे भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) आणि उबाठा यांच्यात सामना रंगणार आहे. पंचायत समिती गणांमध्ये काले, चांदखेड व वराळे गणात दुरंगी लढती होत आहेत.

## सर्वाधिक इच्छुकांची मनधरणी करण्यात भाजप यशस्वी

पिंपरी (दै. संध्या) :

तब्बल नऊ वर्षांने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत असल्याने अनेक इच्छुकांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचे मनसुबे आखले होते. त्यानुसार अपेक्षेप्रमाणे हिंजवडी माण जिल्हा परिषद गट व पंचायत समितीच्या दोन आशा एकूण तीन जागांसाठी ३८ जणांनी उमेदवारी अर्जही दाखल केले होते. परंतु उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी सर्व बंडखोरांना शांत करण्यात व त्यांना वेगवेगळी आश्वासन देऊन बंडखोरी रोखण्यात भाजप व राष्ट्रवादी सारख्या प्रमुख पक्षांना यश आले आहे. यंदा हिंजवडी माण गट व गणात एकूण ३८ जणांचे उमेदवारी अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी पक्षश्रेष्ठींनी विनवणी केल्यानंतर २० जणांनी माघार घेतली. तर १८ जण निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यामध्ये ७ पुरूष व ११ महिलांचा समावेश आहे. उमेदवारी अर्जांची छाननी झाल्यानंतर पक्षांच्या चिन्हावर लढणाऱ्या उमेदवारांनी लगेच प्रचाराचा शुभारंभ करत नारळ फोडला. अनेकांनी प्रचार देखील सुरू केल्याने पक्षश्रेष्टींनी बंडखोरांना प्रचारात सहभागी होण्यासाठी विनवण्या केल्या. अखेर कुणी जिल्हा नियोजन तर कुणी स्वीकृत सदस्य होण्याच्या महत्वकांक्षा व्यक्त करत पक्षश्रेष्ठींना खिंडीत पकडले होते. शेवटच्या क्षणी काहींची समजूत काढून पक्षाने बहुतांश बंडखोरांना वेगवेगळी आश्वासन देऊन शांत केले.

## एक अनुभवी, कर्तृत्ववान आणि विकासाभिमुख नेता गमावला – खासदार श्रीरंग बारणे

पिंपरी (दै. संध्या) :

राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक अनुभवी, कर्तृत्ववान आणि विकासाभिमुख नेता गमावला असल्याची भावना खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केली आहे. अजितदादा पवार हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. कामाप्रती प्रचंड निष्ठा असलेले नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. राज्यातील विविध विकासकामांच्या जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा राहिला असल्याचे बारणे यांनी सांगितले.

खासदार श्रीरंग बारणे यांनी म्हटले आहे की, अजितदादा पवार यांच्या संसदीय राजकारणाची सुरुवात पिंपरी-चिंचवड परिसरातून झाली होती. पिंपरी-चिंचवडचा



समावेश असलेल्या बारामती मतदारसंघातून त्यांनी १९९१ मध्ये लोकसभेची निवडणूक लढवली होती. त्या काळापासून त्यांचे पिंपरी-चिंचवड शहराशी अतूट नाते निर्माण झाले होते. एकत्र काँग्रेस पक्षात असताना अजितदादा पवार यांच्यासोबत जवळून काम करण्याची संधी मिळाल्याचे खासदार बारणे यांनी नमूद केले. नेता म्हणून त्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून त्यांच्या सहवासातून राजकारणातील अनेक बारकावे शिकता आले, असेही त्यांनी सांगितले.

सर्वसामान्य कुटुंबातील अनेक कार्यकर्त्यांना घडवून मोठे करण्याचे काम अजितदादा पवार यांनी केले. स्पष्ट वक्ता, निर्भिड आणि रोखठोक भूमिका हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. "जे पोटात तेच ओठावर" ही त्यांची ओळख होती. पिंपरी-चिंचवड शहरावर अजितदादा पवार यांचे विशेष प्रेम होते. नियोजनबद्ध विकासाच्या माध्यमातून त्यांनी शहराला वेगळ्या उंचीवर नेले. शहराचा सर्वांगीण विकास करताना त्यांनी जागतिक पातळीवर शहराची ओळख निर्माण करण्यासाठी मोठे योगदान दिले.

अजितदादा पवार यांच्या अकाली निधनामुळे पिंपरी-चिंचवड शहर पोरके झाले असून राज्याचेही मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या निधनाने पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, त्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असे भावनिक शब्दांत खासदार श्रीरंग बारणे यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

## पिंपरी-चिंचवडच्या विकासाचे खरे 'दादा' हरपले : आ.शंकर जगताप

पिंपरी (दै. संध्या) :

"आपली जन्मभूमी बारामती असली तरी माझी कर्मभूमी पिंपरी-चिंचवड आहे," असे निक्षून सांगणारे आणि पिंपरी-चिंचवड शहरावर पुत्रवत प्रेम करणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अकाली झालेले अपघाती निधन मनाला चटका लावून जाणारे आहे," अशी भावना आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केली. पिंपरी-चिंचवडच्या विकासाचे ते खरे 'दादा' होते असेही आमदार जगताप पुढे म्हणाले.

आमदार शंकर जगताप पुढे म्हणाले, "अजित पवार हे केवळ ज्येष्ठ नेते नव्हते, तर चाणाक्ष राजकारणी, अभ्यासू व्यक्तिमत्त्व आणि प्रशासकीय कारभाराचा दांडगा अनुभव असलेले कर्तबगार नेतृत्व होते. अशा व्यक्तिमत्त्वाचे आपल्या मधून जाणे हे केवळ पिंपरी-चिंचवडसाठी नव्हे, तर उभ्या महाराष्ट्रासाठी मोठी पोकळी निर्माण करणारे आहे."



१९९२ ते आजतगायत सातत्याने या शहराबरोबर अजितदादांचा स्नेह जोडलेला होता. "पिंपरी-चिंचवड शहराच्या जडणघडणीचे, प्रगतीचे आणि विकासाच्या वाटचालीचे ते खरे शिल्पकार होते, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आमचे वडीलबंधू दिवंगत लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सोबत तब्बल तीस वर्षे शहरासाठी काम केले. शहराचा कायापालट करण्यासाठी झपाटून काम करणारी ही दोन व्यक्तिमत्त्वे होती. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी व्यथित करणारी आहे," असेही त्यांनी नमूद केले.

आमदार जगताप पुढे म्हणाले, "अजितदादांसारखे धडाडीचे, निर्णयक्षम आणि झपाटून काम करणारे नेतृत्व पुन्हा तयार होण्यासाठी मोठा कालावधी लागतो. असा नेता पुन्हा होणे शक्य नाही . या शहरातील प्रत्येक कार्यकर्ता, नेता, पदाधिकारी यांचा अजित दादांशी स्नेह होता, ऋणानुबंध होते. राजकारणातील मतभेद बाजूला ठेवून सर्वांना सोबत घेऊन काम करणारे ते व्यक्तिमत्त्व होते. त्यामुळे त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणारी नाही," असेही त्यांनी भावुक शब्दांत सांगितले.

## दिग्गजांचा पराभव की नियोजित राजकीय 'गेम'?

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड शहर २०१४ पासून भाजपचा बालेकिल्ला म्हणून ओळखले जाते. मात्र नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीत भाजपच्या अनेक दिग्गज नगरसेवकांना पराभवाचा सामना करावा लागल्याने शहराच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. हा पराभव जनतेचा स्पष्ट कौल होता, की पक्षांतर्गत राजकीय गणितातून घडवून आणलेला 'गेम', यावर आता जोरदार चर्चा सुरू झाली आहे. या निवडणुकीत भाजपचे वजनदार चेहरे म्हणून ओळखले जाणारे विलास मडिगेरी, नामदेव ढाके, माई ढोरे, सुजाता पालांडे, ॲड. मोरेश्वर शेडगे, सचिन चिंचवडे आणि जयश्री गावडे यांना पराभव स्वीकारावा लागला. हे सर्व नेते शहरातील भाजपच्या निर्णयप्रक्रियेत प्रभावी मानले जात होते. माई ढोरे या माजी महापौर राहिल्या आहेत तर विलास मडिगेरी हे स्थायी समितीचे माजी सभापती आहेत. त्यांनी आपल्या प्रभाग क्रमांक आठमध्ये मोठमोठी विकासकामेही केली आहेत. तसेच नामदेव ढाके यांनी गेल्या पंचवार्षिक काळात सत्तारूढ पक्षनेते म्हणून जबाबदारी सांभाळली होती. त्यांच्या याच प्रभाग क्रमांक १७ मधून निवडून आलेल्या सचिन चिंचवडे यांना उपमहापौरपदाचा मान मिळाला होता.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त माजी सैनिकांचा सन्मान सोहळा

चिंचवड (दै. संध्या) :

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त वुई टुगेदर फाउंडेशनच्या वतीने सैनिकांचा सन्मान सोहळा चिंचवड येथील यशस्वी क्लासेस हॉलमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन व तिरंगा ध्वजाला सलामी देऊन राष्ट्रगीताने झाली. यानंतर फाउंडेशनच्या सहसचिव मंगला डोळे–सपकाळे व महिला समन्वयक अपर्णा कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली "गर्जा महाराष्ट्र माझा" हे गीत सामूहिकरित्या सादर करण्यात आले. फाउंडेशनच्या वतीने उपस्थित माजी सैनिकांचा सत्कार करून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वुई टुगेदर फाउंडेशनचे अध्यक्ष मधुकर बच्चे हे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी सैनिक हा देशाचा अभिमान असून माजी सैनिक निवृत्तीनंतरही समाजासाठी जे सामाजिक कार्य करतात, त्यांच्याबद्दल समाजाने कायम आदर, आपुलकी व अभिमान बाळगावा, असे प्रतिपादन केले. माजी सैनिकांच्या कर्तृत्वाचा व शिस्तीचा समाजाला निश्चितच फायदा होतो, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी सैनिकांनी आपल्या भावना व्यक्त करत देशसेवेतील अनुभव उपस्थितांसमोर मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सलीम सय्यद यांनी केले, तर सूत्रसंचालन सहसचिव मंगला डोळे–सपकाळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष रवींद्र काळे, सचिव जयंत कुलकर्णी, सहसचिव मंगला डोळे–सपकाळे, खजिनदार दिलीप चक्रे, सल्लागार रवींद्र सागडे, खुशाल दुसाने, महिला समन्वयक अपर्णा कुलकर्णी, सलीम सय्यद, संस्थापक क्रांती कुमार कडूलकर, दारासिंह मन्हास, जावेद शेख, नंदकुमार वाडेकर, लता शिंदे, मेघना बेरी, दिलीप पेटकर, अर्जुन पाटोळे, विलास रासकर, सरिता कुलकर्णी, ओम सोनी, उदय कुलकर्णी, रोहिणी बच्चे, हनीफ सय्यद, अनिल पोरे, अनिल शिंदे, भावीन भंडारी, श्रावणी बच्चे, निलेश आकारे, शंकर कुलकर्णी, आसावरी बच्चे, विलास गटने, अशोक देशपांडे आदींनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी फाउंडेशनचे सल्लागार खुशाल दुसाने यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## राष्ट्रवादीचे नगरसेवक ॲक्शन मोडवर

पिंपरी (दै. संध्या) :

- महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत घेतली बैठक
- प्रभागातील वीज पुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश

प्रभाग क्रमांक 14 आकुर्डीमधील राष्ट्रवादी काँग्रेसचे तीन नगरसेवक ऍक्शन मोडवर आले असून परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या वीज समस्येबाबत त्यांनी पहिली बैठक घेतली. महावितरणच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेत प्रभागातील वीज पूरवठा सुरळीत करण्याचे निर्देश दिले.

नगरसेवक प्रमोद कुटे, नगरसेविका वैशाली काळभोर, अरुणा लंगोटे, सामाजिक कार्यकर्ते गणेश लंगोटे, सागर पुंडे, रोशन जगताप, हिरामण काळभोर, मधव नेर्लेकर, महावितरणच्या भोसरी विभागाचे कार्यकारी अभियंता अतुल देवकर, उपअभियंता अशोक जाधव, कनिष्ठ अभियंता सोनाली शिंदे यांच्यासह सर्व अधिकारी उपस्थित होते. मोहननगर, विठ्ठलवाडी , दत्तवाडी, आकुर्डी परिसरात सातत्याने वीज पुरवठा



खंडित होत आहे. याबाबत बैठकीत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

जय गणेश व्हिजन, सोनिगरा क्लासिक येथील विद्युत केबल, विठ्ठलवाडी, दत्तवाडी येथील एलटी केबल, राम नर्सिंग होम ते प्रमोद कुटे यांचे निवासस्थान परिसरातील वीज पुरवठा सुरळीत करावा. चिंचवड स्टेशन साई बाबा नगर, दवा बाजारला एमआयडीसीवरून होणार वीज पुरवठा बायपास करून आकुर्डी विभागतून जोडावा. डाली एंड समीर व संघवी कंपाउंड येथील ट्रांसफॉर्मर चा वॉक डाउन सर्वे करून लोड वितरीत झाला का हे तपासून घेणे.वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी उपाययोजना हाती घ्याव्यात.फॉल्ट झाल्यावर अधिकारी, दुरुस्ती वाहन उशिरा येते. त्यामुळे वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी विलंब लागतो. त्यासाठी फॉल्ट होताच कर्मचारी यांनी घटनास्थळी हजर व्हावे. मोहननगर येथील वारंवार खंडीत होणारा वीजपुरवठा सुरळीत करावा. प्रधान मंत्री आवास योजनाच्या फीडर वरुण साई मंदिर येथे रिंगमन युनिटटाकावा. हर्षमय सोसायटीचा ट्रांसफॉर्मर कार्यांवित करावा. गाय वासरू चौकातील केबलची समस्या सोडवावी. श्रीमती लिलाबाई खिवसरा शाळेजवळील ट्रांसफॉर्मरला सातत्याने पेट घेते त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात. तसेच सर्वे नंबर १२६, १३५ व महात्मा फूले नगर येथील वारंवार सकाळी खंडित होणारा वीजपुरवठा व प्रभागातील ओवरहेड केबल अंडरग्राउंड कराव्यात, ट्रान्सफॉर्मरला जी आय शीट लावणे.अशा विविध सूचना नगरसेवक प्रमोद कुटे, नगरसेविका वैशाली काळभोर, नगरसेविका अरुणा लंगोटे व गणेश लंगोटे यांनी केल्या. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. येत्या महिन्याभरात ही कामे मार्गी लावली जातील. आकुर्डी परिसरातील वीज पुरवठा सुरळीत केला जाईल, अशी ग्वाही महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

बारामती परिमंडळ (दैनिक संध्या) : महावितरणच्या बारामती परिमंडळात ऊर्जा भवन, बारामती येथे प्रजासत्ताक दिनी मुख्य अभियंता मा.श्री.धर्मराज पेठकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता मा. श्री. दीपक लहामगे, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) मा.श्री. धैर्यशील गायकवाड यांच्यासह अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी मुख्य अभियंता श्री. पेठकर यांच्या हस्ते दहावी व बारावी उत्तीर्ण गुणवंत कर्मचारी पाल्यांचा शिष्यवृत्ती प्रदान करून सत्कार करण्यात आला.



### राजगुरुनगर नगरपरिषदेच्या आरोग्य विभागासाठी नवीन स्विपिंग गाडी समाविष्ट

■ लोकनियुक्त नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांच्या हस्ते उद्घाटन

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त राजगुरुनगर नगरपरिषदेत प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्ष मा. मंगेश गुंडाळ यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अंबादासजी गरकळ, तसेच सर्व नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. प्रजासत्ताक दिनाच्या औचित्याने राजगुरुनगर नगरपरिषदेच्या आरोग्य विभागासाठी शहरातील रस्त्यांची स्वच्छता अधिक प्रभावीपणे करण्यासाठी नवीन स्वीपिंग (साफसफाई) गाडीचे उद्घाटन नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व सर्व नवनियुक्त नगरसेवकांच्या हस्ते करण्यात आले. या आधुनिक स्वीपिंग गाडीमुळे शहरातील प्रमुख रस्त्यांची स्वच्छता अधिक वेगाने व नियमित होणार असून स्वच्छ शहराच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले गेले आहे. तसेच नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत प्राईड सिटी वाडा रोड व तिन्हेवाडी रोड, तांबे वस्ती परिसरात उभारण्यात आलेल्या नवीन पाण्याच्या टाक्यांच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या वॉलमन रूमचे उद्घाटन करण्यात आले. या सर्व कार्यक्रमांचे नियोजन नगरपरिषदेच्या आरोग्य विभाग व पाणीपुरवठा विभागाच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी आनंदाची भावना व्यक्त करत, कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. याप्रसंगी कर्मचाऱ्यांच्या वतीने नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व आभार मानण्यात आले.



### जेजुरीत मां साहेब प्रतिष्ठानच्या वतीने शालेय मल्हार महोत्सव सुरु

जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे कुलदैवत व कलावंताची जन्मभूमी असणाऱ्या जेजुरी नगरीत अंगणवाडी ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना संधी देण्यासाठी सलग 33 व्या वर्षी मां साहेब प्रतिष्ठानच्या वतीने शालेय मल्हार महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त माँ साहेब प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांच्या कला गुणांना संधी तसेच भारतीय लोककला जतन करण्यासाठी दोन दिवस या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या महोत्सवात पहिल्या दिवशी अंगणवाडी, बालवाडी व प्राथमिक गटातील शाळेतील मुले सहभागी झाले होते, देशभक्ती, व लोककलेची नृत्ये सादर करीत चिमुकल्या मुलांनी रसिकांची मने जिंकली. या मल्हार महोत्सवाचे उद्घाटन नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपनगराध्यक्ष गणेश निकुडे, नगरसेवक शिवाजी जगताप, नगरसेविका आमिना पानसरे,मोनिका घाडगे,प्रज्ञा राऊत,मेघा उबाळे,नीलम सात भाई ,भक्ती कोरपड, स्नेहल भालेराव, योगिता दोडके, स्वरुपा खोमणे, माजी नगरसेवक अजिंक्य देशमुख, जेजुरी शहर भाजपाचे अध्यक्ष सचिन पेशवे, शिवसेनेचे विठ्ठल सोनवणे आदी उपस्थित होते. यावेळी सावंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सावंत यांना उलेखानिय कार्याबद्दल विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन प्रतिष्ठानचे डॉ प्रसाद खंडागळे, गणेश जगताप, प्रकाश खाडे, डॉ नितीन केंजळे, प्राचार्य बाळासाहेब झगडे, गिरीश महामुनी, पुष्कर खाडे, अजय पठाण, आदित्य झगडे, डॉ क्षमा केंजळे, भावना खाडे आदींनी केले, कार्यक्रमाचे निवेदन नितीन राऊत यांनी केले.

### वाघजाईनगर येथे प्रजासत्ताक दिन दिमाखात साजरा

चाकण (दैनिक संध्या) : जिल्हा परिषदेच्या वाघजाईनगर (ता.खेड) येथील प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिन विविध उपक्रमांनी आणि मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. प्रारंभी गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. त्यानंतर ध्वजपुजन उद्योजक दत्तात्रय शिळवणे, माजी उपसरपंच बाळासाहेब शिळवणे, शिवाजी शिळवणे उद्योजक सतिश मेणे, शशिकांत साळवे यांनी केले. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ शेडगे व मुख्याध्यापक दत्तात्रय शेवकरी यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. ध्वजाला मानवंदना दिल्यानंतर राष्ट्रगीत, वंदे मातरम, राज्य गीत विद्यार्थ्यांनी सादर केले. शाळेचे मुख्याध्यापक शेवकरी यांनी प्रास्ताविक केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी डंबेल्स, संगीत कवायत, संचलन, मुलींनी पिरॅमिड्स आदी मैदानी क्रीडा प्रकार सादर केले. विद्यार्थ्यांना यावेळी खाऊ वाटप करण्यात आला. नवनाथ शेडगे व बाळासाहेब शिळवणे यांनी आपल्या मनोगतातून शिक्षक, विद्यार्थी व पालकांचे कौतुक केले. शाळेसाठी जास्तीत जास्त योगदान देण्याची आमची भूमिका राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. भाऊसाहेब पांडे यांनी सुत्रसंचालन केले. महेंद्र गाडे यांनी आभार मानले.

# पुरंदरचा राजकीय रणसंग्राम तापला

## अर्ज माघारीनंतर जिल्हा परिषदेसाठी १९ उमेदवार मैदानात

नीरा (दै. संध्या)



पुरंदर तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीचा राजकीय रणसंग्राम चांगलाच तापला असून, उमेदवारी अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी झालेल्या मोठ्या प्रमाणावरील माघारींमुळे निवडणुकीचे चित्र आता स्पष्ट झाले आहे. चारही जिल्हा परिषद गटांमध्ये थेट लढती निश्चित झाल्या असून, येत्या ५ फेब्रुवारी रोजी मतदार कोणाच्या पारड्यात कौल टाकतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पुणे जिल्हा परिषद व पुरंदर तालुका पंचायत समितीच्या निवडणुका ५ फेब्रुवारी रोजी होत असून, मंगळवारी (दि. २७) अर्ज माघारी घेण्याचा शेवटचा दिवस होता. या दिवशी पुरंदर तालुक्यातील चार जिल्हा परिषद मतदारसंघांतून तब्बल २१ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले. त्यामुळे आता जिल्हा परिषदेसाठी १७ पक्षीय आणि २ अपक्ष असे एकूण १९ उमेदवार निवडणुकीच्या रणांगणात उरले आहेत.

पंचायत समिती निवडणुकीतही मोठ्या प्रमाणावर माघारी झाल्या असून, दाखल अर्जांपैकी ५१ उमेदवारांनी माघार घेतली आहे. परिणामी आता ३३ उमेदवारांचे भवितव्य मतदारांच्या हाती जाणार आहे.

१६ ते २१ जानेवारीदरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पार पडली होती. २२ जानेवारी रोजी अर्जांची छाननी झाल्यानंतर तब्बल पाच दिवस अर्ज माघारीसाठी उपलब्ध झाल्याने विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी आपापल्या रणनीती राबवत मोठ्या प्रमाणावर माघारी घडवून आणल्या.

जिल्हा परिषद गटनिहाय चित्र

**दिवे–गराडे गट :**

या गटात माघारीनंतर आता तीन उमेदवार रिंगणात आहेत. भाजपकडून दिव्या संदीप जगदाळे, शिवसेनेकडून ज्योती राजाराम झेंडे, तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून रुपाली अमोल झेंडे यांच्यात थेट लढत होणार आहे.

**बेलसर–माळशिरस गट :**

या गटात पाच उमेदवारांनी माघार घेतली असून सहा उमेदवार मैदानात आहेत.

भाजपचे अजय कैलास इंगळे, शिवसेनेचे रमेश रामचंद्र इंगळे, शिवसेना (उबाठा)चे अमोल दत्तात्रय कामठे, राष्ट्रवादी काँग्रेसचे गौरव विजयराव कोलते, आम आदमी पक्षाचे शहाजी रत्नाकर कोलते आणि काँग्रेसचे दत्तात्रय मारुती झुरंगे यांच्यात अटीतटीची लढत अपेक्षित आहे.

**वीर–भिवडी गट :**

या गटात नऊ उमेदवारांनी माघार घेतली असून सहा उमेदवार निवडणूक रिंगणात उरले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे पुष्कराज संजय जाधव, शिवसेनेचे समिर अरविंद जाधव, काँग्रेसचे नवनाथ चंद्रकांत माळवे, भाजपचे हरिभाऊ कुंडलिक लोळे, तसेच अपक्ष म्हणून अनिल लक्ष्मण धिवार आणि हेमंतकुमार भाऊसाहेब माहूरकर निवडणूक लढवत आहेत.

**निरा–कोळविहीरे गट :**

या गटात सहा उमेदवारांनी माघार घेतल्यानंतर चार उमेदवार शिल्लक राहिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्राजक्ता दिगंबर दुर्गाडे, भाजपच्या सीमा संदीप धायगुडे, काँग्रेसच्या सविता राजेंद्र बरकडे आणि शिवसेनेच्या भारती अतुल म्हस्के यांच्यात सामना रंगणार आहे.

एकूणच पुरंदर तालुक्यातील चार जिल्हा परिषद जागांसाठी विविध राजकीय पक्षांमध्ये जोरदार चुरस निर्माण झाली असून, प्रचाराला आता वेग आला आहे. येत्या काही दिवसांत प्रचार अधिक तीव्र होण्याची शक्यता असून, त्यामुळे पुरंदरचे राजकारण आणखी तापणार हे निश्चित आहे.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त जेजुरी गडावर तिरंगा रोषणाई





जेजुरी (दै. संध्या)

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी गडावर आकर्षक तिरंगा रंगाची विद्युत रोषणाई करण्यात आली होती. जेजुरीच्या खंडोबा मंदिराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या श्री मार्तंड देवसंस्थान च्या वतीने भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त खंडोबा मंदिरे वंदे मातरम् ची थीम फुलांनी साकारली होती. तसेच गडाच्या आवारात 2025 मध्ये क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या खेळाडूंची माहिती व फोटो छा देखावा सादर केला होता. जेजुरी गडाला आकर्षक तिरंगा रोषणाई केली होती. रात्रीच्या वेळी या विद्युत रोषणाई चे होळकर तलावात पडलेले प्रतिबिंब छायाचित्रकार विजय कुमार हरिश्चंद्र यांनी आपल्या कॅमेरात टिपले आहे.

## सूर्यनमस्कार स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण

चाकण (दै. संध्या)



अखिल भारतीय विद्यार्थी सेना, किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठान व किल्लेदार फिरंगोजी नरसाळा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या सूर्यनमस्कार स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

या स्पर्धेचा शुभारंभ ॲड. सर्जेराव पानसरे, डॉ. भाऊसाहेब फुके, ॲड. किरण झिंजुरके, सत्यवान तांबे, राहुल वाडेकर आदींच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संतोष लोणारी, ॲड. किशोर झिंजुरके, जयेंद्र नवगिरे, योगेश साखरे, नामदेव पानसरे, मुरलीधर मंडलिक, किशोर परदेशी, अनंतराव देशमुख, अनुपमा देशमुख, भगवान मेदनकर, जगन्नाथ गोरे, कैलास साळवे, ॲड. सिद्धेश चिंचवडे आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत चाकण परिसरातील १२ शाळांमधील मुलांनी भाग घेतला होता. यामध्ये प्रामुख्याने विद्या व्हॅली स्कूल, विद्यानिकेतन स्कूल, जॉयस स्कूल, होली एंजल स्कूल, प्रियदर्शनी स्कूल वाकी, पोदार स्कूल आंबेठाण, जिल्हा परिषद शाळा चाकण, ग्लॅडियस स्कूल एकता नगर, पी. के. स्कूल व ज्ञानवर्धिनी स्कूल या शाळांचा सहभाग होता. भारतीय संस्कृतीतील आरोग्याचा मंत्र घराघरात पोहोचवण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, असे ॲड. किरण झिंजुरके यांनी सांगितले.

योग शिक्षक सागर अकोले, योग शिक्षिका अरुणा सावंत यांच्या प्रशिक्षणा अंतर्गत ही सूर्यनमस्कार स्पर्धा घेण्यात आली.

परीक्षक म्हणून वैष्णवी कुटे, प्रज्ञा कुटे, आकाश कांबळे, संजय मोरे यांनी काम पाहिले.

यामध्ये खालील स्पर्धकांनी यश संपादन केले.

- लहान गट मुले (८ते१३) प्रथम क्रमांक - यशराज योगेश मेदनकर, द्वितीय क्रमांक द्विज दीपक सावंत व तृतीय क्रमांक यशराज जनार्दन टाकळे,
- लहान गट मुली (८ते१३) प्रथम क्रमांक आरोही विजय सुतार, द्वितीय नीतिशा जगरवळ, तृतीय क्रमांक स्वरा चव्हाण,.
- मोठा गट मुले (१४ ते २१) प्रथम क्रमांक तरुण ईश्वर बिरकुरे. द्वितीय क्रमांक सुशांत गिरी, तृतीय क्रमांक तुकडोजी होडे,.
- मोठा गट मुली (१४ ते २१).

प्रथम क्रमांक - पूर्वा कृष्णा मुंगसे, द्वितीय क्रमांक प्रगती विष्णू बोचरे, तृतीय क्रमांक हिंदवी प्रशांत गोरे. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, शाल, श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. राहुल वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. किरण झिंजुरके यांनी आभार मानले.

## महावितरणचा ‘अन्नदाता ते ऊर्जदाता’ चित्ररथ ठरला संचलनाचे आकर्षण

बारामती (दै. संध्या)

■ प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित ध्वजवंदन कार्यक्रम





प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे आयोजित ध्वजवंदन व संचलनाच्या शासकीय कार्यक्रमात महावितरणचा चित्ररथ आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. मा. मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी ‘अन्नदाता ते ऊर्जादाता’ या संकल्पनेवर आधारीत महावितरणच्या या चित्ररथाचे कौतुक केले आहे.

मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी देशात सौर ऊर्जेला चालना देण्यासाठी व शेतकऱ्यांना शाश्वत व मोफत वीज उपलब्ध करून देण्यासाठी अन्नदाता ते ऊर्जदाता ही संकल्पना राबवली आहे. मा. मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मागेल त्याला सौर कृषी पंप योजना व मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीतून राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज उपलब्ध करून देत या संकल्पनेच्या पुर्ततेला मोठी गती दिली आहे. या योजनांमधून राज्यातील ४५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रजासत्ताक आयोजित कार्यक्रमात चित्ररथाच्या माध्यमातून महावितरणने केवळ तंत्रज्ञान नव्हे, तर पर्यावरणाभिमुख व समृद्ध महाराष्ट्राचे चित्र मांडले आहे. देशातील पहिले सौरग्राम ठरलेल्या सातारा जिल्ह्यातील मान्याची वाडीचा देखावा चित्ररथात लक्षवेधक ठरला.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत १६ हजार मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प प्रस्तावित असून आत्तापर्यंत ३ हजार ३०० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प पूर्ण झाले आहेत. यातून ८ लाख शेतकऱ्यांच्या ४० लाख एकर शेतीला दिवसा व शाश्वत वीजपुरवठा सुरू आहे. तर मागेल त्याला सौर कृषी पंप योजने अंतर्गत ११ लाख शेतकऱ्यांना सौर कृषी पंप देण्याचे उद्दिष्ट मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत एकाच महिन्यात ४५ हजार ९११ शेतकऱ्यांना सौर कृषिपंप बसवण्याचा विश्वविक्रम ‘गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’मध्ये नोंदवला गेला आहे. याशिवाय प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या माध्यमातून आत्तापर्यंत ४ लाख २५ हजार घरगुती ग्राहकही विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण व स्वावलंबी झाले आहेत.

## चाकण येथील रक्तदान शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद

चाकण (दै. संध्या)





रक्ताचा तुटवडा भासू नये व अपघातग्रस्तांना तातडीने रक्ताचा पुरवठा होऊन त्यांचे प्राण वाचले जावेत हा हेतू डोळ्यासमोर ठेवून, चाकण येथे नवयुग मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला प्रचंड प्रतिसाद मिळाला. या रक्तदान शिबिरात ८७ जणांनी रक्तदान केले, अशी माहिती आदर्श नगरसेवक मंगेश कांडगे यांनी दिली. येथील गोल्डन चौकातील दत्त मंदिरात पुणे - पिंपरी चिंचवड ब्लड बँकेच्या सहकार्याने या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आरोग्य यज्ञात सहभागी व्हा, रक्तदान करून देश कार्य आणि देव कार्यात सहभागी व्हा. अपघात ग्रस्तांसाठी रक्तदान शिबिरे ही काळाची गरज आहे, याची जाणीव ठेवून नवयुग मित्र मंडळाच्या वतीने या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याला नगरसेवक आकाश जाधव, उद्योजक किशोर जगनाडे, मंगेश कांडगे, योगेश गायकवाड, नगरसेविका अनिता घोगरे आदींच्या हस्ते सन्मानपत्र, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

# शिरूरमध्ये ७७वा प्रजासत्ताक दिन उत्सवात साजरा

शिरूर (दै. संध्या)



शिरूर तहसील कार्यालयाच्या आवारात मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा पार पडला. तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी महेश डोके, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रीतम पाटील, पोलीस निरीक्षक संदेश केंजळे उपस्थित होते. शिरूर नगरपरिषदेत नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजित पाचर्णे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी मुख्याधिकारी प्रीतम पाटील, उपनगराध्यक्ष मितेश गादिया व नगरसेवक उपस्थित होते. कृषी उत्पन्न बाजार समितीत सहाय्यक निबंधक सहकार तथा प्रशासक हरिश्चंद्र कांबळे यांच्या हस्ते, तर खरेदी-विक्री संघात सभापती राजेंद्र नरवडे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. सचिव अनिल ढोकले उपस्थित होते.

चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालयात शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सचिव नंदकुमार निकम व प्राचार्य डॉ. के. सी. मोहिते उपस्थित होते. विद्याधाम प्रशालेत शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य राजेंद्र भटेवरा यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी मुख्याध्यापक गुरुदत्त पाचर्णे उपस्थित होते. आयेशा बेगम उर्दू हायस्कूलमध्ये कॅप्टन विश्वनाथ मांडगे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. सचिव मोहम्मद हुसेन पटेल, मुख्याध्यापक फारुख सांगलीकर उपस्थित होते. लाटेआळीतील आझाद सोशल फाउंडेशन येथे नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. व्यवस्थापक नसीम खान, सागर बोरगे उपस्थित होते. मुस्लिम जमात जामा मशिद येथे सभापती आयेशा सय्यद यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. न्यू इंग्लिश रयत शाळेत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व माजी उपनगराध्यक्ष जाकिर खान पठाण यांच्या हस्ते, सिताबाई थिटे फार्मसी कॉलेजमध्ये कॅप्टन विठ्ठल वराळ यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. प्राचार्य डॉ. अमोल शहा उपस्थित होते. ज्ञानगंगा विश्वविद्यालयात पोलीस उपाधीक्षक प्रशांत ढोले, पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे, धर्मेंद्र खांडरे,संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेराम घावटे व अमृतेश्वरी घावटे व पालक प्रतिनिधी श्यामकांत वर्पे यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण झाले.वन विभागाच्या कार्यालयात तालुका वनाधिकारी निळकंठ गव्हाणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. डेक्कन स्कूलमध्ये माजी सैनिक बाळासाहेब शेवाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य, समूहगीत, भाषणे, लाठी-काठी व तलवारबाजीची प्रात्यक्षिके तसेच रोबोटचे सादरीकरण केले.बालाजी इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये माजी अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रल्हाद कचरे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. अध्यक्ष सदाशिव पवार, मुख्याध्यापक विनायक म्हसवडे उपस्थित होते. विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले . ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त शिरूर शहरात शालेय विद्यार्थ्यांनी सकाळी प्रभातफेरी काढत ‘भारत माता की जय’, ‘वंदे मातरम्’च्या जयघोषाने परिसर दुमदुमून सोडला.

## थोडक्यात पण महत्वाचे...




## हावडा मुंबई मेलमधील गांजा तस्करीचे हायप्रोफाईल कनेक्शन

नागपूर (दैनिक संध्या) : हावडा मुंबई मेलमधून मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आलेल्या गांजाचे कल्याण-मुंबईत हायप्रोफाईल कनेक्शन असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास आता रेल्वेच्या गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे. दरम्यान, पोलिसांचे एक पथक भिवंडीत पोहचले असून तेथून एका गांजा तस्कराला रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. हावडा मुंबई मेलच्या एसी कोचमधून आरपीएफ आणि रेल्वे पोलिसांनी संयुक्त कारवाई करून बिहारमधील चंद्रेश्वर राधा पासवान (वय ४०, रा. लडुई, कुसुम्हरा) आणि विक्कीकुमार वीरेंद्र सिंह (वय १९, रा. रामपूर, बिहार) या दोन गांजा तस्करांना २२ जानेवारीला ताब्यात घेतले. त्यांच्याकडून तब्बल ६० किलो गांजा जप्त केला होता. हे दोघे सध्या रेल्वे पोलिसांच्या कस्टडीत असून त्यांची चौकशी केली जात आहे. प्राथमिक चौकशीत हे दोघे गांजाची ही खेप कल्याण (मुंबई)ला घेऊन जात होते, अशी माहिती पुढे आली आहे. ओडिशातील गांजा तस्करांनी या दोघांना ही खेप पोहचविण्याची जबाबदारी सोपविली होती. तर, कल्याणमध्ये एक तस्कर ही खेप स्विकारणार होता, हे चौकशीतून पुढे आल्यानंतर या प्रकरणाची चौकशी रेल्वेचे पोलिस अधीक्षक मंगेश शिंदे यांनी स्थानिक गुन्हे शाखे (एलसीबी)कडे सोपविली. त्यानुसार, एपीआय पंजाबराव डोळे यांच्या नेतृत्वात एक पथक दोन दिवसांपूर्वी कल्याणकडे रवाना झाले होते. या गांजा तस्करीशी संबंधित एक आरोपी भिवंडीत असल्याचे उघड झाल्यानंतर पोलिसांनी भिवंडीत छापेमारी करून एका आरोपीला आज मंगळवारी ताब्यात घेतले. त्याला घेऊन पोलिसांचे हे पथक बुधवारी दुपारपर्यंत नागपुरात पोहचणार आहे.

## 2,400 कोटींची थकबाकी ! राज्यातील 'आरटीई' शिक्षण व्यवस्था 'व्हेंटिलेटर'वर




नागपूर (दैनिक संध्या): 'मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार' कायदा गरीब व वंचित घटकांतील मुलांसाठी लागू करण्यात आला. कागदावर ही योजना सामाजिक न्यायाची क्रांती ठरली असली तरी प्रत्यक्षात ही व्यवस्था आता आर्थिक व प्रशासकीय श्वासावर जगणाऱ्या 'व्हेंटिलेटर'वरील रुग्णासारखी बनली आहे. खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क सरकारकडून भरपाई स्वरूपात दिले जाते. मात्र, गेल्या दशकभरात ही रक्कम वेळेवर न मिळाल्यामुळे राज्य सरकारवर आता सुमारे २,४०० कोटी रुपयांची थकबाकी जमा झाली आहे. २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात आरटीई प्रतिपूर्तीसाठी केवळ १७३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. प्रत्यक्षात मात्र ४५ ते ६९ कोटी रुपयेच वितरित झाले. ही रक्कम एकूण थकबाकीच्या तुलनेत अत्यंत नगण्य आहे. सध्या सरकारने प्रतिविद्यार्थी वार्षिक प्रतिपूर्ती १७,६७० रुपये निश्चित केली आहे. महागाई, शिक्षकांचे वेतन, पायाभूत सुविधा आणि डिजिटल शिक्षण खर्च पाहता ही रक्कम खासगी शाळांसाठी अत्यंत अपुरी असल्याचे शाळा व्यवस्थापनांचे म्हणणे आहे. यामुळे अनेक शाळा संघटनांनी आक्रमक भूमिका घेत 'पैसे नाही, तर प्रवेश नाही' अशी घोषणा केली आहे. काही शाळांनी तर आरटीईअंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडूनही थेट शुल्क मागण्यास सुरुवात केली असून, त्यामुळे कायद्याच्या 'मोफत शिक्षण' या मूलभूत तत्त्वालाच हरताळ फासला जात आहे. मुंबई उच्च न्यायालयाने नुकतेच राज्य सरकारला शाळांच्या थकबाकीची पडताळणी ८ आठवड्यांत पूर्ण करून पुढील २ आठवड्यांत रक्कम अदा करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, राज्याच्या आर्थिक स्थितीवरून हे आदेश कितपत प्रत्यक्षात येतात, याबाबत शिक्षण क्षेत्रात साशंकता व्यक्त केली जात आहे.

# सकारात्मक जीवनशैली हीच सुदृढ आरोग्याची गुरुकिल्ली : डॉ. जगन्नाथ दीक्षित

### सुचेता स्वास्थम यांच्या 'स्वास्थम' मोबाईल ॲपचे भव्य अनावरण




पुणे (दै. संध्या)

आजच्या काळात अधिक डॉक्टर आणि अधिक रुग्णालये म्हणजेच अधिक सुदृढ समाज असा गैरसमज वाढत चालला आहे. प्रत्यक्षात औषधांपेक्षा योग्य आहार, नियमित व्यायाम आणि सकारात्मक जीवनशैली हेच निरोगी आयुष्याचे खरे आधारस्तंभ आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ आरोग्यतज्ज्ञ डॉ. जगन्नाथ दीक्षित यांनी केले.

आरोग्यविषयक जनजागृतीसाठी सुचेता स्वास्थम यांच्या वतीने विकसित करण्यात आलेल्या 'स्वास्थम' या मोबाईल ॲपचे अनावरण प्रजासत्ताक दिनाच्या पवित्र दिवशी, २६ जानेवारी रोजी, मोठ्या अभिमानाच्या वातावरणात पार पडले. ज्येष्ठ आरोग्यतज्ज्ञ डॉ. जगन्नाथ दीक्षित, प्रसिद्ध उद्योजक, स्टार्टअप सल्लागार व मार्गदर्शक तसेच NEF फाउंडेशनचे संस्थापक श्री. गणेश नटराजन आणि ज्येष्ठ उद्योगपती तसेच बायोरॅड मेडिसिसचे व्यवस्थापकीय संचालक श्री. जितेंद्र हेगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रमुख पाहुणे म्हणून हा सोहळा संपन्न झाला. आरोग्यदायी आणि सक्षम भारत घडवण्याच्या दिशेने उचललेले हे पाऊल प्रजासत्ताक दिनी साकारत असल्याचा विशेष अभिमान यावेळी व्यक्त करण्यात आला.

डॉ. दीक्षित म्हणाले, "आज सोशल मीडियामुळे माहितीचा प्रचंड भडिमार होत आहे. प्रत्येकजण स्वतःला तज्ज्ञ समजतो; मात्र कोणती माहिती शास्त्रीयदृष्ट्या योग्य आहे आणि कोणती दिशाभूल करणारी आहे, हे तपासणे अत्यंत गरजेचे आहे. आजार बरा करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध आहे, पण माणूस आजारीच पडू नये यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या 'स्वास्थम'सारख्या उपक्रमांची समाजाला नितांत गरज आहे."

स्वास्थमचे संस्थापक सौ.सुचेता गोडबोले देशपांडे आणि श्री. राहुल देशपांडे यांनी सांगितले की, देशातील विविध सामाजिक-आर्थिक स्तरांतील शेकडो लोकांच्या आरोग्यविषयक अभ्यासातून 'स्वास्थम' ॲपची संकल्पना विकसित करण्यात आली आहे. "पुढील दहा वर्षांत कोट्यवधी लोकांपर्यंत पोहोचून त्यांना आरोग्याबाबत सजग बनवणे, हा आमचा दीर्घकालीन उद्देश आहे," असे त्यांनी नमूद केले.

श्री. जितेंद्र हेगडे म्हणाले, "सुदृढ आरोग्य म्हणजे केवळ शारीरिक तंदुरुस्ती नव्हे, तर मानसिक आरोग्यही तितकेच महत्त्वाचे आहे. सकारात्मक विचारसरणी शरीरावर आणि एकूण जीवनमानावर खोल परिणाम घडवते."

श्री. गणेश नटराजन यांनी आपल्या भाषणात सांगितले, "जसे जीवन जगण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे, तसेच निरोगी राहण्यासाठी आरोग्यशिक्षणही तितकेच महत्त्वाचे आहे. समाजाला योग्य आरोग्यदिशा दाखवणारे 'स्वास्थम'सारखे उपक्रम काळाची गरज आहेत."

ॲपच्या अनावरणानंतर आयोजित आरोग्यविषयक चर्चासत्रात डॉ. राजेश धोपेश्वरकर, डॉ. अतुल राक्षे, मेजर विशाल कराड, डॉ. विनिता केतकर, डॉ. किरण खरात आणि डॉ. पुष्कर खैर यांनी आपले विचार मांडले.

यावेळी ज्येष्ठ उद्योगपती तसेच सुचेता स्वास्थमचे मार्गदर्शक व धोरणात्मक सल्लागार श्री. सुनील देशमुख आणि उद्योजकतेचे प्रख्यात प्राध्यापक, सुचेता स्वास्थमचे मार्गदर्शक व सल्लागार श्री. विनोद शास्त्री यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच 'स्वास्थम' ॲपच्या प्रारंभिक चाचणी टप्प्यात (Early Trials) महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल परिचारिका – रूपाली कसबे, नेहल जावळे, नीलम शेख, नंदिनी शेट्ये, संजय कुऱ्हाडे आणि कांचन देशकर यांचा सुचेता स्वास्थम यांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पुष्कर खैर यांनी केले, प्रास्ताविक सौ.सुचेता गोडबोले देशपांडे यांनी मांडले, तर श्री.राहुल देशपांडे यांनी आभारप्रदर्शन केले.

# TECNO Spark Go3 रु. ८,९९९ मध्ये विक्रीसाठी उपलब्ध

मुंबई (दै. संध्या)

■ टिकाऊपणा आणि सर्वोत्तम सिग्नलवर लक्ष केंद्रित




सर्वसामान्य भारतीयांसाठी तयार केलेला, TECNO Spark Go3, जो ₹८,९९९ मध्ये उपलब्ध आहे, आता देशभरात विक्रीसाठी उपलब्ध आहे. वास्तविक जीवनातील वापरासाठी डिझाइन केलेला, हा फोन अशा वापरकर्त्यांसाठी टिकाऊपणा, स्मार्ट वैशिष्ट्ये आणि सर्वोत्तम कनेक्टिव्हिटी एकत्र आणतो, जे त्यांच्या डिव्हाइसकडून दैनंदिन जीवनाशी जुळवून घेण्याची अपेक्षा करतात. 'देश जैसा दमदार' या तत्त्वज्ञानावर आधारित, TECNO Spark Go3 एक अशी चमक घेऊन येतो जी वापरकर्त्यांना थोडे अधिक तेजस्वीपणे चमकण्यास मदत करते. हा फोन अशा लोकांसाठी बनवला आहे ज्यांना एक महत्त्वाकांक्षी दिसणारा फोन हवा आहे, जो दैनंदिन, वास्तविक जीवनातील अनिश्चितता आत्मविश्वासाने हाताळू शकेल.

Spark Go3 IP64 धूळ आणि पाणी प्रतिरोधक क्षमतेसह येतो, तसेच तो पडल्यास होणारे नुकसान सहन करण्याइतका टिकाऊ आहे, ज्यामुळे वापरकर्ते दैनंदिन धक्के, सांडणे आणि आश्चर्यांपासून चिंतामुक्त राहू शकतात. या अनुभवात भर घालतो तो १२०Hz सुपर स्मूथ डिस्प्ले, जो स्क्रोलिंग, स्वाइपिंग आणि ॲप्स स्विच करणे लक्षणीयरीत्या वेगवान आणि अधिक प्रवाही बनवतो - असा स्मूथनेस जो तुम्हाला त्वरित जाणवतो.

गोष्टी स्मार्ट आणि सोप्या ठेवण्यासाठी Ella AI आहे, जो TECNO चा व्हॉइस असिस्टंट आहे आणि तो वापरकर्त्यांना त्यांच्या स्वतःच्या भाषांमध्ये, ज्यात हिंदी, तमिळ, बंगाली, गुजराती आणि मराठी यांचा समावेश आहे, समजून घेतो. दैनंदिन कामे असोत किंवा त्वरित आदेश, संवाद नैसर्गिक आणि सहज वाटतो. आणि जेव्हा नेटवर्क लपंडाव खेळायला लागते, तेव्हा No Network Communication 2.0 हे सुनिश्चित करते की वापरकर्ते वेअरहाऊस, तळघर, कारखाने, बांधकाम क्षेत्र आणि ग्रामीण भागांसारख्या कमी किंवा नेटवर्क नसलेल्या भागातही कनेक्टेड राहू शकतील.

TECNO Spark Go3 आता ४GB रॅम + ६४GB स्टोरेज व्हेरिएंटमध्ये ₹८,९९९ मध्ये, भारतातील प्रमुख रिटेल स्टोअर्समध्ये आणि ॲमेझॉनवर उपलब्ध आहे. हा स्मार्टफोन चार रंगांच्या पर्यायांमध्ये उपलब्ध आहे: टायटॅनियम ग्रे, इंक ब्लॅक, गॅलेक्सी ब्लू आणि ऑरोरा पर्पल. Spark Go3 केवळ दिखावा करण्यासाठी आलेला नाही. तो दमदार, विश्वासार्ह आणि दैनंदिन भारतासाठी सज्ज होण्यासाठी आला आहे.

## भारताच्या संरक्षण क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या सत्यनारायण नुवाल यांना पद्मश्री

नागपूर (दै. संध्या)

नागपूरच्या मातीवरून जागतिक संरक्षण उद्योगात आपले स्थान निर्माण करणारे उद्योजक सत्यनारायण नुवाल. भारतीय संरक्षण क्षेत्रात स्वावलंबनाची नवी परिभाषा घडवणाऱ्या सोलार ग्रुपची कहाणी जिद्द, ध्येयवाद आणि दूरदृष्टीची साक्ष आहे. त्यांच्या कठोर मेहनतीमुळे आणि नेतृत्त्वामुळे सोलार इंडस्ट्रीज आता केवळ भारतात नव्हे, तर ८० देशांमध्ये पोहोचलेली जागतिक कंपनी बनली आहे. भारत सरकारने त्यांच्या योगदानाला मान देत पद्मश्री पुरस्कार प्रदान केला, हा सन्मान त्यांच्या वैयक्तिक यशाबरोबरच 'आत्मनिर्भर भारत'च्या संकल्पाचा गौरव ठरला आहे. सन १९५२मध्ये सत्यनारायण नुवाल यांचा जन्म राजस्थानच्या भिलवाड्यातील सामान्य कुटुंबात झाला. शिक्षण पूर्ण करून ते रोजगाराच्या शोधात महाराष्ट्रात आले. सुरुवातीला परिस्थिती अतिशय कठीण होती. काही रात्री रेल्वे प्लॅटफॉर्मवर झोपून काढाव्या लागल्या आणि परिवहन व्यवसायात अपघातामुळे सर्व काही गमावले. मात्र, हार मानली नाही. चंद्रपूरच्या अब्दुल सत्तार भाईंच्या गोदामात स्फोटकांचा लघु भाग भाड्याने मिळाल्याने त्यांना व्यवसायाची संधी मिळाली. या कठीण काळात चिकाटी, धैर्य आणि उद्यमशीलतेची कास त्यांनी सोडली नाही. नुवाल यांनी सुरुवातीला शाई, मेणबत्ती, ट्रान्सपोर्ट यांसारख्या व्यवसायात प्रयत्न केले. परंतु, अपयशाने त्यांना घाबरवले नाही. नागपूरमध्ये स्थलांतर करून त्यांनी स्फोटक व्यवसायात सुरुवात केली. सुरुवातीला वितरणाचे काम केले. पण, बाजाराची मागणी, कोळसा खाणीतील गरजा आणि गुणवत्ता तपासण्याचा सखोल अभ्यास करून त्यांनी स्वतःची उत्पादन धोरणे ठरवली. १९९५ मध्ये स्वतःचा लघु उत्पादन प्रकल्प सुरू करून त्यांनी सोलार इंडस्ट्रीजचा पाया रचला.

# रिपब्लिकन पक्षाला उपमहापौर पद मिळावे – रामदास आठवले



पुणे (दै. संध्या)

पुणे महानगरपालिकेत रिपब्लिकन पक्षाला उपमहापौर पद मिळावे, अशी ठाम भूमिका रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केली आहे. तसेच रिपब्लिकन पक्षाचे राज्य सचिव बाळासाहेब जानराव यांच्याबाबत काही वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेल्या बातम्या पूर्णतः तथ्यहीन असून त्यांच्या विरोधात पक्षाकडून कोणतीही कारवाई केली जाणार नाही, असेही आठवले यांनी स्पष्ट केले.

मुंबई येथे रिपब्लिकन पक्षाचे पुणे शहराध्यक्ष संजय सोनावणे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने रामदास आठवले यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी ही भूमिका मांडली. शिष्टमंडळामध्ये प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, पुणे शहर सरचिटणीस महिपाल वाघमारे, श्याम सदाफुले, माजी नगरसेवक जयदेव रंधवे आदी उपस्थित होते.

पुणे महानगरपालिकेत रिपब्लिकन पक्षाचे पाच नगरसेवक निवडून आले असून एक उमेदवार केवळ १३८ मतांनी पराभूत झाला आहे, तर दोन उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर राहिले आहेत. ही पक्षासाठी अत्यंत उल्लेखनीय कामगिरी असल्याचे आठवले यांनी नमूद केले. मागील कार्यकाळाप्रमाणे यंदाही रिपब्लिकन पक्षाला उपमहापौर पद मिळावे, यासाठी आपण राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तसेच भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केली असून, मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेऊ, असे दोन्ही नेत्यांनी मत व्यक्त केल्याचे आठवले यांनी सांगितले. दरम्यान, काही कार्यकर्त्यांनी बाळासाहेब जानराव यांच्याविरोधात खोटे आरोप करत वर्तमानपत्रांत बातम्या प्रसिद्ध केल्याबाबत रामदास आठवले यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. बाळासाहेब जानराव हे जुने व निष्ठावंत कार्यकर्ते असून त्यांच्या विरोधात कोणतीही कारवाई होणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पक्षाची शिस्त सर्वांनी पाळावी आणि कोणीही कार्यकर्त्यांची बदनामी करू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

# विश्वबंधुत्वाचा भाव प्रदर्शीत करणारा महाराष्ट्राचा ५९वा निरंकारी संत समागम भव्य रुपात संपन्न

सांगली (दै. संध्या)

■ सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या कौस्तुभ पुरस्काराने सन्मानित

■ शाश्वत निराकार परमात्म्याचा बोध प्रत्येक युगाची आवश्यकता: निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज



समागमात येणाऱ्या सर्व श्रद्धाळूंसाठी दिवस-रात्र सामूहिक भोजनाची (लंगर) व्यवस्था मैदानाच्या तिन्ही भागांमध्ये केली आहे. एका लंगर स्थानावर एकाच वेळी जवळपास 10,000 श्रद्धाळू भोजन करू शकतात. या व्यतिरिक्त 4 कँटीनची व्यवस्था करण्यात आली आहे ज्यामध्ये अत्यल्प दरात चहा, कॉफी, शीत पेय व अल्प-उपहार उपलब्ध आहेत. मिनरल वॉटरची देखील उचित व्यवस्था याच कँन्टीनमध्ये करण्यात आली आहे. समागम स्थळावर तीन डिस्पेंसरी, दोन प्राथमिक चिकित्सा केंद्र तसेच आईसीयू सुविधेसहित हॉस्पिटलची व्यवस्था केलेली होती. ॲलोपॅथी, आयुर्वेद व होमिओपॅथी पद्धतिने जवळ जवळ 50,000 भाविकांना स्वास्थ सेवा प्रदान केल्या गेल्या. या व्यवस्थेमध्ये 54 डॉक्टर्स व 326 चिकित्सा कर्मचारी कार्यरत होते. आपत्कालीन परिस्थितीत सेवेसाठी 11 ॲम्ब्युलन्स तैनात होत्या. प्रशंसनीय आहे, की कायरोप्रॅक्टिक चिकित्सा शिबिरामध्ये विदेशातून 23 तर भारतातून 2 विशेषज्ञांनी आपल्या निष्काम सेवा प्रदान केल्या. तीन दिवसांमध्ये जवळपास 3,000 भाविकांनी या चिकित्सेचा लाभ घेतला.

समागमाच्या तिसऱ्या दिवशी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,मुंबई यांच्या वतीने वर्ष 2026 चा प्रतिष्ठित "कौस्तुभ पुरस्कार" सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण तथा संसदीय कार्य मंत्री तथा सांगलीचे पालकमंत्री माननीय श्री.चंद्रकांत दादा पाटील यांच्या शुभहस्ते प्रदान केला गेला. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक श्री.संजयजी भोकरे. सिद्धार्थ भोकरे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉक्टर विश्वास आरोटे शेती प्रमुख नवनाथ जाधव दैनिक समर्थ गावकरी महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर सागर बोधगिरे विश्वनाथ कोकणे कोकणे आदी आदि मान्यवर उपस्थित प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्राचा तीन दिवसीय 59वा वार्षिक निरंकारी संत समागम 26 जानेवारी रोजी सांगलीमध्ये भव्य रुपात यशस्वीरित्या संपन्न झाला. समागमाच्या समापन सत्रामध्ये सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी लक्षावधी भाविक भक्तगणांना संबोधित करताना सांगितले, की शाश्वत निराकार परमात्म्याचा बोध प्राप्त करुन जीवनात प्रेम, दया आणि करूणेचा भाव अंगीकारणे ही प्रत्येक युगाची आवश्यकता राहिली आहे.

सतगुरु माताजी म्हणाल्या, की मानवाचा दृष्टिकोण बहुधा नकारात्मक होऊन जातो. त्यामुळे तो चांगुलपणामध्येही दोष शोधत राहतो. याउलट संतजन परमात्म्याच्या जाणीवेमध्ये जगून अंधारातही प्रकाश किरणाला आधार बनवतात. ब्रह्मज्ञानाद्वारे ते स्वत:चे जीवन उज्ज्वल करतातच, शिवाय समाजालाही प्रकाशमान करतात. संतांच्या जीवनाचे वैशिष्ट्य समजावताना माताजी म्हणाल्या, की संतांचे जीवन दिखावा, कट-कारस्थानापासून मुक्त आणि सहज, सरळ व सकळांच्या कल्याणासाठी समर्पित असते. सतगुरु माताजींनी निरंकारी भक्तांना सत्संग, सेवा व सिमरणाच्या माध्यमातून आत्ममंथन करत सजग व सकारात्मक जीवन जगण्याचे आवाहन केले.

समागमाच्या तिन्ही दिवशी "आत्ममंथन" या विषयावर कवि दरबाराचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये देश-विदेशातील एकंदर 22 कवी व कवियित्रींनी मराठी, हिंदी, पंजाबी, हरियाणवी, भोजपुरी व इंग्रजी भाषांच्या माध्यमातून काव्य पाठ प्रस्तुत केला ज्याचा भरपूर आनंद श्रद्धाळु भक्तांनी प्राप्त केला.

समागमाच्या तिसऱ्या दिवशी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,मुंबई यांच्या वतीने वर्ष 2026 चा प्रतिष्ठित "कौस्तुभ पुरस्कार" सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण तथा संसदीय कार्य मंत्री तथा सांगलीचे पालकमंत्री माननीय श्री.चंद्रकांत दादा पाटील यांच्या शुभहस्ते प्रदान केला गेला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक श्री.संजयजी भोकरे, श्री. सिद्धार्थ भोकरे,श्री. विश्वासराव आरोटे (सरचिटणीस महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ (मुंबई) महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव यांच्यासह अनेक पदाधिकारी संजय फुल सुंदर उपस्थित होते.

समागमाच्या पहिल्या दिवशी सत्संग कार्यक्रमा दरम्यान सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांच्या करकमला द्वारे समागम विशेषांक "आत्ममंथन" आणि 'गुरूदेव हरदेव' या पुस्तकाची नूतन भाषांतर आवृत्ती तसेच अन्य पुस्तकांच्या भाषांतर आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. या सर्व प्रकाशन सामग्री व मिशनच्या पत्र-पत्रिका समागम मध्ये लावलेल्या प्रकाशनाच्या 6 स्टॉल्सवर अत्यंत माफक दरात उपलब्ध आहेत ज्याचा लाभ श्रद्धाळू भक्तगण मोठ्या उत्साहाने घेत आहेत.

समागमाच्या दुसऱ्या दिवसाची सुरूवात एका आकर्षक सेवादल रॅलीने झाली ज्यामधेय महाराष्ट्रासह अन्य ठिकाणांहून आलेल्या हजारो सेवादल बंधु-भगिनी आपआपली खाकी-निळी वर्दी परिधान करून सहभागी झाले होते. सतगुरू माताजी व निरंकारी राजपिताजींचे रॅलीमध्ये आगमन होताच मंडळाच्या सेवादल आधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन या दिव्य युगुलाचे सहर्ष स्वागत केले.

सेवादल रॅलीच्या प्रारंभी सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांनी आपल्या करकमलाद्वारे शांतीचे प्रतिक असणारा मिशनचा श्वेत ध्वज फडकवला. या रॅलीमध्ये बँण्डच्या सूरात पी.टी.परेड, संगीतमय योगा, मानव पिरॅमिड, मल्लखांब, एरोबिक, उम्ब्रेला फॉर्मेशन तसेच अनेक विविध खेळ प्रकार व साहसी कवायती प्रस्तुत केल्या.

त्याचबरोबर मिशनच्या शिकवणीवर आधारित विविध भाषांच्या माध्यमातून लघु नाटिका सादर करण्यात आल्या ज्याद्वारे भक्तीमधील सेवेचे महत्व अधोरेखित केले गेले तसेच अहंकार रहित होणे, सेवेमधील चेतनता व आदर भाव इत्यादी दिव्य गुण धारण करण्याची प्रेरणा देण्यात आली.

सेवादल व श्रद्धाळू भक्तगणांना संबोधित करताना सतगुरू माता सुदीक्षाजी महाराजांनी प्रतिपादन केले, की जीवनात निराकार परमात्म्याला प्राथमिकता देत समर्पित भावनेने सेवा करायची आहे. सेवा केवळ एक कार्य नसून ते पूर्ण मनोभावे श्रद्धा व सत्कार भावनेने करायची भावना आहे. सेवेच्या सोबत जीवनात सत्संगला महत्व देणे सुद्धा सेवेचेच एक रूप आहे. सेवेच्या मूळ भावनेला समजून केले गेलेले कार्यच जीवनामध्ये सुधार करते.

समागमात उभारलेली भव्य निरंकारी प्रदर्शनी श्रद्धाळूंच्या आकर्षणाचे केंद्र बनली आहे. या वर्षी सदर प्रदर्शनी 'आत्ममंथन' या विषयावर आधारित असून ज्यामध्ये आत्मचिंतन, आत्मबोध आणि मानवी मुल्यांचे महत्व अत्यंत प्रेरणादायी पद्धतीने प्रस्तुत केले आहे.

ही प्रदर्शनी मुख्यतः तीन भागांमध्ये विभागली आहे. तिच्या मुख्य भागात मिशनचा इतिहास, विचारधारा तसेच देश-विदेशात केले जाणारे मानवतेसंबंधी निष्काम सेवा कार्यांचे प्रतिबिंब दर्शवले आहे. दुसऱ्या भागात "बाल-प्रदर्शनी" उभारली असून त्यामध्ये बालकांना उज्ज्वल जीवन जगण्याची प्रेरणा देणारे शिक्षाप्रद आकर्षक मॉडेल्स बनवले आहेत ज्याचा उल्लेख निरंकारी राजपिताजी यांनी आपल्या विचारांमध्येही केला. प्रदर्शनीच्या तिसऱ्या भागात मिशनची समाजकल्याण शाखा 'संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशन'च्या माध्यमातून राबवल्या जाणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती देणाऱ्या प्रदर्शनीचा समावेश आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### राज्यपाल व मुख्यमंत्री यांच्याकडून अजित पवार यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन

बारामती (दैनिक संध्या) : राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी केंद्रीय नागरी विमानवाहतूक मंत्री राममोहन नायडू किंजारापू, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शिक्षणमंत्री दादाजी भुसे, महिला व बाल विकास मंत्री कु. अदिती तटकरे, बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंह राजे भोसले, अजित पवार यांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवार यांच्यासह खासदार सुप्रिया सुळे, आमदार राहूल कुल, ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार आदी उपस्थित होते.

### आमच्या कुटुंबाला दादांचे नेहमीच मार्गदर्शन असायचे - नगराध्यक्षा मनीषाताई गोरे



चाकण (दैनिक संध्या) : राज्याचे उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार अजित पवार महाराष्ट्राचे दादा हे आज आपल्यात नाही, यावर विश्वासच बसत नाही. उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांची खेडचे आमदार स्व. सुरेशभाऊ गोरे हे सदस्य असल्यापासून आम्हांला जीवाभावाची साथ लाभली होती. सुरेशभाऊंचा दादांच्या माध्यमातून राजकीय प्रवास घडला. विधान सभेतही भाऊ कामकाज करीत असताना दादांचे मार्गदर्शन घेत असत. भाऊंचे निधन झाले. त्यावेळीही अजितदादा पवार साहेब यांनी माझा सहकारी गेला, अशी भावना व्यक्त केली होती. पवार साहेब आणि अजितदादा यांनी कायमच आम्हा गोरे कुटुंबाला सामाजिक व राजकीय मार्गदर्शन केले असल्याची प्रतिक्रिया चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषाताई गोरे यांनी दिली. आजित दादांच्या अकाली जाण्याने महाराष्ट्र राज्याची, पुणे जिल्ह्याची न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. अजितदादांना खेड तालुक्याच्या वतीने व चाकण नगरपरिषद आणि स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठानच्या वतीने भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करत आहे.



### जुन्नर तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी अशोक खरात

जुन्नर (दैनिक संध्या) : जुन्नर तालुका मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सकाळचे बातमीदार अशोक खरात यांची तर सचिवपदी सचिन कांकरिया यांची बिनविरोध निवड झाली. मराठी पत्रकार परिषद, मुंबई व पुणे जिल्हा पत्रकार संघ संलग्न असलेल्या जुन्नर तालुका मराठी पत्रकार संघाची २०२६-२०२७ साठी नूतन कार्यकारिणीची नारायणगाव येथे झालेल्या वार्षिक सभेत निवड केली. सभेच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे मावळते अध्यक्ष मीनानाथ पानसरे होते. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : प्रवीण फल्ले, दिनकर आहेर (उपाध्यक्ष), धर्मेंद्र कोरे (कार्याध्यक्ष), अर्जुन शिंदे (सहसचिव),विजय लोखंडे (खजिनदार), महेश घोलप (सहखजिनदार), सुरेश भुजबळ (जिल्हा निमंत्रक), दादा रोकडे (तक्रार निवारण समिती अध्यक्ष), मीनानाथ पानसरे (जुन्नर विभाग प्रमुख), अमर भागवत (नारायणगाव विभाग प्रमुख), विजय देशपांडे (आळेफाटा विभाग प्रमुख), अ. संजय शेटे (ओतूर विभाग प्रमुख). सदस्य राजेश कणसे, गोकूळ कुरकुटे, अशोक डेरे, विजय चाळक, अतुल कांकरिया, मंगेश पाटे, रवींद्र कोल्हे, हितेंद्र गांधी, अमोल गायकवाड, प्रवीण ताजणे, दुष्यंत बनकर, वसंत शिंदे, अण्णा लोणकर. सल्लागार : ज्येष्ठ पत्रकार रवींद्र पाटे, नितीन गाजरे, नितीन ससाणे, आनंद कांबळे, लक्ष्मण शेरकर, ज्ञानेश्वर भागवत. कायदेविषयक सल्लागार : ॲड. यू. सी. तांबे, ॲड. रवींद्र देवकर, ॲड. भूषण शेटे, ॲड. अनिकेत भुजबळ.

### पाच मिनिटांत निर्णय, तासाभरात जीआर! अजितदादा’ ठरले गती देणारे नेतृत्व



आळंदी (दैनिक संध्या) : इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी दिलेले एक निवेदन, आणि अवघ्या काही मिनिटांत सुरू झालेली प्रशासनाची चक्रे फिरली ही घटना म्हणजे कामाचा माणूस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अजित पवारांच्या कार्यशैलीचे जिवंत उदाहरण ठरली आहे. इंद्रायणी सेवा फाऊंडेशनच्या वतीने इंद्रायणी नदी प्रदूषणाबाबत तत्कालीन विरोधी पक्षनेते अजित पवार यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदन देऊन इंद्रायणी सेवा फौंडेशनचे कार्यकर्ते बाहेर पडले असतानाच, अवघ्या पाच मिनिटांत दादांनी त्यांना परत बोलावून घेतले. निवेदन बारकाईने वाचल्यानंतर दादांनी कोणतीही दिरंगाई न करता, थेट जिल्हाधिकाऱ्यांना फोन लावला. अजित पवारांनी कार्यकर्त्यांच्या समोरच जिल्हाधिकाऱ्यांना इंद्रायणी नदी प्रदूषणासंदर्भात तात्काळ बैठक आयोजित करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले. ‘फाईल फिरवू नका, आजच बैठक घ्या,’ अशा शब्दांत दादांनी प्रशासनाला गती दिली. यानंतर अवघ्या पंधरा मिनिटांत जिल्हाधिकारी कार्यालयातून फोन आला आणि इंद्रायणी नदी संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक निश्चित झाल्याची माहिती देण्यात आली.विशेष बाब म्हणजे, पुढील अर्ध्या तासातच संबंधित बैठकीचा अधिकृत आदेश (जीआर) कार्यकर्त्यांच्या हाती पडला. निवेदन, आदेश आणि कृती—हे सारे एका तासाच्या आत घडल्याने उपस्थित सर्वजण स्तिमित झाले. आज अनेक प्रश्न निवेदनांपुरतेच मर्यादित राहतात. मात्र, आश्वासनांपलीकडे जाऊन निर्णय, आदेश आणि अंमलबजावणी यांचा वेग दाखवणारे नेतृत्व म्हणजे अजितदादा पवार, हे या घटनेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले. लोकांच्या प्रश्नांबाबत असलेली संवेदनशीलता, प्रशासनावरची पकड आणि कामातील वेग यामुळेच ‘कामाचा माणूस’ अशी ओळख दादांनी निर्माण केली. आज त्या आठवणी मनात उजळून निघतात.

# आक्षेपार्ह विधान करणाऱ्या अंजली भारतींवर गुन्हा दाखल करावा

## लष्कर-ए-भीमा संघटनेचे संस्थापक सचिन धिवार यांची पोलीस आयुक्तांकडे मागणी

पुणे (दै. संध्या)



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी तथा सामाजिक कार्यकर्त्या अमृता फडणवीस यांच्या संदर्भात सोशल मीडियावर अत्यंत घृणास्पद, हिंसाचारास प्रवृत्त करणारी व महिलांच्या सन्मानाला धक्का देणारी विधाने केल्याप्रकरणी अंजली भारती यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते व लष्कर-ए-भीमा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सचिन शिवाजीराव धिवार यांनी पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांचाकडे केली. या मागणीचे निवेदन स्वीकारत पोलीस आयुक्तांनी याची दखल घेतली असून, गुन्हा दाखल करण्याचे निर्देश पोलिसांना दिले.

धिवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २७ जानेवारी रोजी युट्यूब, इन्स्टाग्राम आदी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रसारित झालेल्या एका व्हिडिओमध्ये अंजली भारती यांनी बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्याचा उल्लेख करत अमृता फडणवीस यांच्यासंदर्भात अत्यंत आक्षेपार्ह, स्त्रीद्वेषी आणि हिंसाचारास प्रोत्साहन देणारी विधाने केली. ही विधाने कोणत्याही प्रकारे अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या कक्षेत येत नसून ती थेट लैंगिक हिंसाचाराचे समर्थन व प्रोत्साहन देणारी असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. यावेळी आंबेडकरी चळवळीतील अनेक कार्यकर्ते, महिला उपस्थित होत्या.

सचिन धिवार म्हणाले, "आंबेडकरी चळवळीच्या आडून अंजली भारती यांनी ही विधाने केली आहेत. मात्र, आंबेडकरी विचार महिलांचा सन्मान, प्रतिष्ठा व सुरक्षितता जपणारी आहेत. त्यामुळे भारती यांची विधाने महिलांच्या सन्मानाला ठेस पोहोचवणारी असून, समाजात द्वेष, भीती व अस्थिरता पसरवणारी आहेत. सोशल मीडियातून मोठ्या प्रमाणावर ही विधाने प्रसारित झाल्याने अनेक महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्यामुळे या बेताल महिलेविरोधात गुन्हा दाखल करून तातडीने कठोर कारवाई करावी. अन्यथा 'लष्कर-ए-भीमा'च्या महिला ब्रिगेडकडून भारती यांना धडा शिकवण्यात येईल."

अंजली भारती यांच्या विधानांमुळे सार्वजनिक नैतिकता, सामाजिक शांतता आणि स्त्री-सन्मान यांचा भंग झाल्याचा दावा करत त्यांच्याविरोधात भारतीय दंड संहिता, भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित व्हिडिओचा दुवा तक्रारीसोबत जोडण्यात आला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन कठोर कायदेशीर कारवाई करावी, जेणेकरून भविष्यात महिलांविरोधात व हिंसाचारास प्रवृत्त करणारी विधाने करणाऱ्यांना आळा बसेल, अशी मागणी सचिन धिवार यांनी केली आहे.

## चाकण शहरात प्रजासत्ताक दिन विविध उपक्रमांनी साजरा

चाकण (दै. संध्या)



स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या येथील स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व जुनिअर कॉलेज आणि ज्ञानवर्धिनी विद्यालय तसेच भामा इंग्लिश मिडियम स्कुल मध्ये झेंडावंदन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. भाजपा उद्योग आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष अशोक भुजबळ यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे व चाकण सोसायटीच्या अध्यक्षा राजश्री गोरे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, संचालक अंकुश पवार, विष्णू गोरे, ओंकार गोरे, नगरसेवक महेश शेवकरी, रणजित जरे, हर्षद लेंडघर, प्रेम जगताप, अनिल लोहकरे, शशिकांत जाधव, नगरसेविका जयश्री नायकवाडी, आरती परदेशी, रूपाली कांडगे, साधना गोरे, पुनम शेवकरी, स्वाती लेंडघर, वर्षा शेवकरी, विजया तोडकर, नगरसेवक विशाल नायकवाडी, युवा उद्योजक योगेश देशमुख, उद्योजक अशोक जाधव, बापू शेवकरी, मुख्याध्यपिका प्रमिला गोरे, प्रिन्सिपल माधुरी गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, पालक प्रतिनिधी गणेश कड, अंकुश बोऱ्हाडे सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थी, पालक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. देशभक्तीपर गाण्यावर कवायत, सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित ड्रामा, योगा ॲक्ट, लाठीकाठी परेड, बालक मंदिर मधील विद्यार्थ्यांची भाषणे, देशभक्तीपर गाण्यावर रिंगडान्स, लेझीम, समूहगीत, मागील वर्षांमध्ये प्रत्येक वर्गात प्रथम आलेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा व आदर्श शिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. नगराध्यक्षा मनीषा गोरे व अशोक भुजबळ यांनी यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

विकास गोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. लिंभोरे यांनी सूत्रसंचालन, तर ओंकार गोरे यांनी स्वागत केले. नगरसेवक महेश शेवकरी यांनी आभार मानले.

## कडबा खरेदीला येण्याच्या निमगावकरांना आठवणी

निमगाव केतकी (दै. संध्या)



राजकारणात येण्यापूर्वी मी निमगाव केतकीच्या शनिवारच्या आठवडे बाजारात कडबा खरेदी करण्यासाठी येत होतो, अशी आठवण निमगाव केतकी (ता. इंदापूर) येथे झालेल्या प्रत्येक कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार आवर्जून करत व माझा आणि निमगाव केतकीकरांचा किती जुना ऋणानुबंध आहे, याची ते भाषणामध्ये आवर्जून आठवण करून देत असत. बुधवारी सकाळी अजितदादांचे विमान अपघातात निधन झाल्यानंतर ग्रामस्थांनी दादांच्या या आठवणींना उजाळा देत शोक व्यक्त केला. अजितदादांच्या अपघाती निधनाची बातमी सकाळी वाऱ्यासारखी निमगाव पंचक्रोशीत पसरली. याचा धक्का सर्वांनाच बसला. ग्रामस्थांसह दुकानदार व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने सर्व दुकाने व्यवहार बंद ठेवत दादांना श्रद्धांजली अर्पण केली. श्री केतकेश्वर विद्यालयाला सुट्टी देण्यात आली. पंचक्रोशीतील वरकुटे खुर्द, गोतंडी, सराफवाडी, पिटकेश्वर, शेळगाव येथील सर्व व्यवहार दुकाने दिवसभर बंद ठेवण्यात आले. अजितदादांनी प्रत्येक गावाला कोणत्या ना कोणत्या प्रकारे विकास निधी दिल्याच्या आठवणी ग्रामस्थ सांगत होते.

## चाकणला राक्षेवाडी येथे हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात संपन्न

चाकण (दै. संध्या)



स्त्री समतेचा आधुनिक विचार प्रत्यक्ष सत्यात उतरवण्यासाठी आणि एकमेकींमधील संवाद वाढवण्याकरीता चाकण नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे यांच्या पुढाकाराने चाकण येथील राक्षेवाडी मध्ये आयोजित करण्यात आलेल्या हळदी कुंकू समारंभाला महिलांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. खेड पंचायत समितीच्या माजी उपसभापती ज्योती अरगडे, खेडचे आमदार बाबाजी काळे, उद्योजक केशव अरगडे, नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. आमंत्रित करण्यात आलेल्या महिलांना यावेळी मनीषा गोरे व सुवर्णा राक्षे यांच्या हस्ते हळदी कुंकवाचे वाण देऊन आकर्षक भेट वस्तूंचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी नगरसेविका जयश्री नायकवाडी, साधना गोरे, पुनम शेवकरी, अनिता घोगरे, रूपाली कांडगे, आरती परदेशी, स्वाती लेंडघर, महेश शेवकरी, उद्योजक श्यामराव राक्षे, किरण कौटकर, श्रीकांत जाधव, राहुल कांडगे, हर्षद लेंडघर, ॲड. प्रकाश गोरे, अनिल लोहकरे, नितीन गोरे, मंगेश कांडगे, रणजीत जरे, प्रेम जगताप आदी उपस्थित होते. प्रत्येक शुभकार्याचा आनंद हा सर्व स्त्रियांचा समान अधिकार आहे. हा संदेश या कार्यक्रमातून समाजाला यावेळी देण्यात आला. हळदी कुंकू कार्यक्रम हा समाजाच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडवणारा उपक्रम आहे.

## नारायणगाव वारूळवाडीत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

नारायणगाव (दै. संध्या)



नारायणगाव वारूळवाडी परिसरात शाळा, पोलीस स्टेशन व शासकीय कार्यालय येथे ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यात ग्रामपंचायत कार्यालय नारायणगाव येथे सरपंच शुभदा वाव्हळ, वारूळवाडी ग्रामपंचायत सरपंच विनायक भुजबळ, ग्रामोन्नती मंडळ संचालक सदस्य निलेश प्रकाश पाटे, नारायणगाव पोलीस स्टेशन सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे, जि.प.उर्दू शाळा रोहिदास वाजगे, छत्रपती संभाजी महाराज पुतळा पश्चिम वेस नंदिनी बेल्हेकर, प्राथमिक शाळा नं.१ अंजली खैरे, शाळा नं.२ राणी दरेकर, ग्रामीण रुग्णालय अधीक्षक डॉ. दिप्ती कळमकर, दुध उत्पादक सोसायटी चेअरमन किरण डेरे, ग्रामीण सचिवालय चावडी मंडल अधिकारी शितल गर्जे, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा पूर्व.वेस हरीश्चंद्र कोल्हे, ग्रामवैभव इमारत माजी सैनिक एकनाथ वाजगे, प्राथमिक शाळा नारायणवाडी नरेंद्र गोसावी, प्राथमिक शाळा पाटे खैरे मळा निलेश जाधव, प्राथमिक शाळा बाग. गावठाण नामदेव नाईक, प्राथमिक शाळा कोल्हे मळा नंदकिशोर जायकर, प्राथमिक शाळा दरंदाळे मळा दिनेश शिंदे, प्राथमिक शाळा आर्वी केंद्र गणेश लिंबाजी वाव्हळ, गणेश जनार्दन वाव्हळ यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

तर नारायणगाव पोलीस स्टेशन येथे पोलिसांना सहकार्य करणाऱ्या व विविध क्षेत्रात कौतुकास्पद कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. यात सुन्नी मुस्लिम जमात अध्यक्ष एजाज आतार, सामाजिक कार्यकर्ते नामदेव खैरे, रॉयल अकॅडमीचे प्रथमेश वाणी, पत्रकार अशफाक पटेल, निवेदक अभय वारुळे, अनिल धांडे, योगेश डेरे, अनिस पठाण, आपदा मित्र सुशांत भुजबळ, माणिक नरवडे, सफाई कर्मचारी संजय माने, पोलीस भरती झालेले समीर खान, पोलीस पाटील, ट्रॅफिक वॉर्डन, पोलीस कर्मचारी, खेळाडू, पोलीस मित्र, माजी सैनिक, सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संस्था प्रतिनिधी यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांना प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी नारायणगाव पोलीस स्टेशन येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे, पोलीस उपनिरीक्षक जगदीश पाटील, सोमशेखर शेटे, गोपनीय विभागाचे दत्ता ढेंबरे, ग्रामपंचायत सदस्य जुबेर आतार, मुस्लिम ट्रस्टचे विश्वस्त हाजी नुरमोहंमद मणियार, सलीम मणियार, केजीएन फाउंडेशन सचिव रियाज मणियार, पोलीस स्टेशनचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांसह पोलीस पाटील, पोलीस मित्र, सन्मानार्थी उपस्थित होते.

यावेळी सपोनि प्रवीण संपांगे यांनी धूम्रपानबाबत शपथ देत उपस्थितांना मार्गदर्शन करत प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या संस्थेत अजित पवार यांना श्रद्धांजली

पुणे (दै. संध्या)



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे आज सकाळी विमान अपघाती दुःखद निधन झाले. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असून राज्यभरातील कार्यकर्ते, नेते आणि सर्वसामान्यांमधूनही हळहळ व्यक्त होत आहे. पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या ममता बाल सदन (बालगृह) कुंभारवळण संस्थेत उपमुख्यमंत्री अजित दादा पवार आणि विमान दुर्घटनेतील त्यांच्या सहकाऱ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. २ मिनिटांचे मौन पाळून संस्थेतील निरागस मुली, सेवाभावी कर्मचारीवर्ग आणि उपस्थित प्रत्येक व्यक्ती काही क्षण स्तब्ध झाली होती. दोन मिनिटांचे मौन पाळताना वातावरणात एक वेगळीच शांतता पसरली होती, जणू त्या शांततेत अजितदादांच्या मदतीच्या पावलांचे ठसे अजूनही उमटलेले होते. या वेळी बोलताना पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांचे पहिले मानसपुत्र तथा संस्थेचे अध्यक्ष दिपकदादा गायकवाड यांच्या शब्दांतून भावना ओघळत होत्या. “२००२-२००३ सालचा दुष्काळ अजूनही आमच्या स्मरणात ताजा आहे. पाण्यावाचून होरपळणारा परिसर, अनिश्चित भविष्य आणि ममता बाल सदन (बालगृह) कुंभारवळणचे लोणी काळभोर येथे स्थलांतर...पुणे येथे पीडीसी बँकेच्या सर्वसाधारण बैठकीत माईंनी हा प्रश्न अजित पवार यांच्यासमोर मांडला. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता अवघ्या सेकंदात लोणी काळभोर येथे सोसायटीचे गोडाऊन उपलब्ध करून दिले. लोणी काळभोर येथे मुलींची संस्था स्थलांतर केल्याने त्या काळात माईंच्या मनावर आणि आमच्या सगळ्यांच्या काळजावर दडपण होतं. पण अशा अंधारात अजितदादा प्रकाशासारखे धावून आले,” असे सांगताना त्यांचा आवाज गहिवरून आला. त्या नंतर “अजितदादांनी कोणतीही पूर्वसूचना न देता, रात्री उशिरा संस्थेला भेट दिली. कुठलेही भाषण नाही, कुठलीही प्रसिद्धी नाही, फक्त खिशात हात घालून त्यांनी माईंच्या आणि माझ्या हातात रक्कम ठेवली आणि म्हणाले, ‘काही अडचण आली तर नक्की सांगा, मी तुमच्या पाठीशी आहे.’ त्या एका वाक्याने आमच्यातील भीती दूर झाली, आणि नव्याने जगण्याचं बळ मिळालं,” असे सांगताना संस्थेत उपस्थित अनेकांचे डोळे ओलावले. तसेच मुलींचा वर्ष भराचा खाण्या-पिण्याचा प्रश्न सोडविला. यावेळी लोणी काळभोर विविध कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष विठ्ठल काळभोर आणि स्थानिक सरपंच ललिता काळभोर उपस्थित होते. दिपक दादांनी पुढे सांगितले की, संस्थेतील मुलींच्या शाळा प्रवेशापासून ते त्यांच्या भवितव्यापर्यंत अजितदादांनी नेहमीच माईंच्या पाठीशी भक्कम आधार म्हणून उभे राहिले. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शाळा-महाविद्यालयात मुलींच्या प्रवेशासाठी देखील दादांची कायम मदत झाली. “खिशात हात घालून, मनापासून मदत करणारे दादा आम्ही कधीही विसरणार नाही,” हे शब्द उच्चारताना त्यांना अश्रू आवरता आले नाहीत. या भावुक कार्यक्रमाला ममता बाल सदन (बालगृह) च्या अधीक्षिका स्मिता पानसरे, वरिष्ठ लिपिक संजय गायकवाड, जनसंपर्क अधिकारी मुकेश चौधरी, मोनिका क्षीरसागर, रवी ओहोळ, चांदणी शिरोळकर, संगीता कणसे, अशोक पवार यांच्यासह संस्थेतील मुली मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. प्रत्येकाच्या मनात एकच भावना दाटून आली होती, मदतीचे हात, प्रेमाचे शब्द आणि निःस्वार्थ आधार हेच खरे नेतृत्व असते. हा कार्यक्रम केवळ आठवणींचा नव्हता; तो माणुसकीवरचा विश्वास दृढ करणारा, कृतज्ञतेच्या अश्रूंनी ओलावलेला आणि अजितदादा पवार यांच्या संवेदनशील नेतृत्वाला मौनातून दिलेला मानाचा मुजरा होता. कधी कधी शब्द अपुरे पडतात...आणि आठवणीच डोळ्यांत पाणी आणतात. आज पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या संस्थेत असाच एक हृदयस्पर्शी क्षण अनुभवायला मिळाला.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या माईंच्या कार्याशी जोडलेल्या माणुसकीच्या, संवेदनशीलतेच्या आणि आधाराच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी संस्थेच्या वतीने एक शांत, पण भावनांनी ओथंबलेला कार्यक्रम पार पडला.